अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९५ । मंगळवार २८ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com



**'सहजयोग'**
**भाग ४०**

### तुम्ही सहजयोगासाठी काही चांगले करू शकत नाही

सहजयोगच तुमच्यासाठी चांगले करतो. तुम्हाला असे वाटत असेल की तुम्ही सहजयोगाच्या हितासाठी येथे आला आहात, तर तुम्ही भ्रमात आहात, कारण सहजयोग हा प्रत्यक्षात सर्वशक्तिमान परमेश्वराशी साक्षात्कार करण्याचा मार्ग आहे. जे घेण्यासाठी तयार आहेत, जे वाढण्यासाठी तयार आहेत, तेच पुढे जाऊ शकतात. आणि जे देण्यासाठी आले आहेत, ते येथे काहीही प्राप्त करू शकत नाहीत. देणे तर फार दूरची गोष्ट आहे; तुम्ही फक्त यासाठी कृतज्ञ असले पाहिजे की तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि तुम्ही प्रकाशमान झाला आहात.आपण आपल्या बोटांच्या टोकांवर आपल्या कुंडलिनीचा अनुभव घेऊ शकतो आणि हात हलवून इतरांना आत्मसाक्षात्कार देऊ शकतो. असे करण्याचे धैर्य कुणालाही नाही. कदाचित तुम्ही याबद्दल बोलणारे अनेक लोक पाहिले असतील, पण तुम्ही सर्व, जे इतरांची कुंडलिनी जागृत करू शकता आणि येथे बसले आहात, त्यांनी परामेश्वरचे आभार मानले पाहिजेत की, हे परामेश्वरा, माझी अशी कोणती विशेषता आहे की तू मला ही क्षमता बहाल केलीस? तू किती करुणावान आहेस. ०५-फेब्रुवारी-१९७६

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### पाणीपुरीतून विषबाधा: ६ वर्षांच्या चिमुरड्याचा मृत्यू

रांची: बिर्यानीनंतर कलिंगड खाल्ल्यामुळे एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना पाणीपुरी खाल्ल्यानं ६ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. तर ६० जण आजारी पडले आहेत. यात लहान मुलांची संख्या अधिक आहे. या सगळ्यांना ताप, पोटदुखी, अतिसार आणि उलट्यांचा त्रास होत आहे. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही दुर्दैवी घटना झारखंडच्या गिरीडीहमध्ये घडली आहे. गिरीडीह जिल्ह्यातील मुफस्सिल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाजतो गावात ही घटना घडली. शनिवारी सायंकाळी एका विक्रेत्याने घरोघरी जाऊन पाणीपुरी विकली होती. अनेक लहान मुलांना आणि नागरिकांना पोटदुखी, उलट्या, अतिसार आणि तीव्र तापाचा त्रास सुरू झाला. रविवारी सकाळपर्यंत परिस्थिती हाताबाहेर गेल्याने सर्वांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणातील दोषी विक्रेत्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## धर्माच्या नावाखाली वासनेचा 'बाजार'

# बेलापूरच्या भोंदू गणेश बाबाला बेड्या!

## पोटदुखीच्या बहाण्याने महिलेवर वारंवार अत्याचार आणि २० लाखांची लूट

### कॅप्टन खरात, गडगे बाबा, बाळूमामाचा कथित अवतार आणि आता गणेश बाबा... भोंदूंची शृंखला सुरूच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** धर्माचा बुरखा पांघरून भोळ्याभाबळ्या महिलांचे लैंगिक आणि आर्थिक शोषण करणाऱ्या भोंदूगिरीचा उच्छाद अहिल्यानगर जिल्ह्यात सुरूच आहे. भोंदू कॅप्टन अशोक खरात, संगमनेरचा गडगेबाबा यांच्यानंतर आता बेलापूर (ता. श्रीरामपूर) येथील गणेश बाबा ऊर्फ गणेश माधवराव शिंदे याच्या पापाचा घडा भरला आहे. पोटदुखीवर उपचार करण्याच्या बहाण्याने एका महिलेवर वारंवार बलात्कार करून तिची २० लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या या नराधमाला श्रीराम पूर पोलिसांनी अटक केली आहे. अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी या भोंदूची 'मस्ती' जिरवल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

**प्रसादातून गुंगी आणि नराधमाचे कृत्य**

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीरामपूर परिसरातील एका पीडित महिलेला २०२३ मध्ये पोटाच्या अल्सरचा त्रास होता. बेलापूर खटकाळी येथील गणेश महाराज शिंदे हा आजार बरा करतो, असे समजल्याने पीडित महिला त्याच्याकडे गेली. सुरुवातीला त्याने लिंबू आणि उदी पाण्यात टाकून प्यायला दिली. त्यानंतर १५ हजार रुपयांची मागणी करून पाच दिवसांनी पुन्हा बोलावले. पाच दिवसांनी महिला पुन्हा गेली असता, या भोंदूने प्रसादातून खडीसाखर, पेढा आणि उदीमध्ये गुंगीचे औषध मिसळून दिले.



महिलेवर गुंगी चढताच गणेश बाबाने तिला मागच्या खोलीत नेले. तिथे रांगोळीचे गोल रिंगण आखून पुन्हा औषधाच्या नावाखाली गुंगीचे पाणी पाजले. महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र शरीरातील शक्ती क्षीण झाल्याचा फायदा घेत या नराधमाने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला.

**बदनामीची भीती दाखवून २० लाखांची लूट**

एवढ्यावरच हा नराधम थांबला नाही. तू जर पुन्हा आली नाहीस तर तुझे पोटाचे दुखणे वाढेल आणि तुझे मरण ओढवेल, अशी भीती त्याने पीडितेच्या मनात घातली. समाजातील बदनामीच्या भीतीने आणि आजारपणाच्या दहशतीने पीडित महिला त्याच्या आश्रमात वारंवार जात राहिली. प्रत्येक वेळी हा भोंदू तिला धमकावून 'दक्षिणा' म्हणून पैशांची किंवा सोन्याची (पान ४ वर)

### राष्ट्र सह्याद्री'चे आवाहन: अंधश्रद्धेपासून सावध राहा!

**आजचे युग हे विज्ञानाचे आहे. शारीरिक व्याधींसाठी कोणत्याही बाबा-महाराजांकडे न जाता तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. स्वतःला दैवी शक्तीचे अवतार म्हणवून घेणारे हे भोंदू केवळ तुमचे आर्थिक आणि शारीरिक शोषण करण्यासाठी टपलेले असतात. जर तुमच्या परिसरात असा कोणी भोंदू लोकांची फसवणूक करत असेल, तर त्वरित पोलिसांशी संपर्क साधा. अंधश्रद्धेला बळी पडू नका आणि आपली सुरक्षितता धोक्यात घालू नका.**

# वन कर्मचाऱ्याला झाडाला बांधून चंदनाच्या झाडाची चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वन विभागाच्या जिल्हा कार्यालयात रात्रपाळीला काम करणाऱ्या वन कर्मचाऱ्याला चौघा जणांच्या टोळीने झाडाला बांधून परिसरातील दोन चंदनाची झाडे चोरून नेली होती. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने कसून तपास करून या चोरीच्या गुन्ह्यातील चौघांच्या टोळीतील दोघांना मोठ्या सीताफिने छत्रपती संभाजीनगर परिसरात अटक केली. इतर दोघे आरोपी मात्र फरार झाले. अटक केलेल्यांमध्ये मशिद नशीब गोलवाल व शाहिदखा आलीखा कलेसे (दो. रा.जंजाळा, ता. सिल्लोड, छत्रपती संभाजी नगर) यांचा समावेश आहे. त्यांच्या ताब्यातून एक सीबीझेड मोटरसायकल हस्तगत करण्यात आली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी रात्री २.१५ वा. चे सुमारास वन विभागीय कार्यालय अहिल्यानगर या ठिकाणी रात्रपाळीस तैनात असलेले वनमजुर रमेश पोपट शेळके (रा. गुंडेगांव, ता. जि. अहिल्यानगर) यांना अनोळखी ४ आरोपींनी अशोकाच्या झाडास बांधुन सहाय्यक वनसंरक्षक यांचे निवास स्थानाजवळील २० हजार रुपये किमतीची २ चंदनाची झाडे तोडुन चोरुन नेली . या घटनेबाबत अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्या नगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या गुन्ह्याचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला सूचना दिल्या होत्या.



**टोळीतील दोघांना पकडले; स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी**

**अटक केलेल्या दोघा आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्याच्या वेळी वापरलेली वीस हजार रुपये किमतीची एक सीबीझेड मोटरसायकल (एम.एच. २८ डब्लु ९७३८) जप्त करण्यात आली आहे. आरोपींना गुन्ह्याचे पुढील तपासकामी अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. अटक केलेल्या या टोळीकडून अहिल्यानगर जिल्ह्यातील इतरही चंदन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस सूत्रांकडून वर्तविण्यात येत आहे.**

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सुनिल पवार, फुरकान शेख, शाहिद शेख, गणेश धोत्रे, बाळासाहेब नागरगोजे, अमृत आढाव, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, प्रशांत राठोड, किशोर शिरसाठ, योगेश कर्डीले, भगवान धुळे, अरुण मोरे महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांचे पथक तयार करुन तपास कामी रवाना करण्यात आले.

या पथकाने गुन्हा ठिकाणी भेट देवुन आरोपीचे येण्या जाण्याचे मार्गाची पाहणी केली, तसेच यापुर्वी शासकिय कार्यालयामधील चंदन चोरी करणारे आरोपींची माहिती संकलित करुन व व्यवसायीक कौशल्याचे आधारे या गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करण्यात आले. त्यामध्ये रेकॉर्ड वरील आरोपी मसीद गोलवाल व त्याचे इतर साथीदार असल्याचे निष्पन्न झाले. या माहितीचे आधारे छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील अजिंठा, सिल्लोड, बदनापुर, (पान ४ वर)

# 'प्रहार' शिवसेनेत विलीन करा, विधान परिषदेवर संधी देऊ!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची बच्चू कडूंना थेट ऑफर; विदर्भात शिवसेना भक्कम करण्याची रणनीती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात एक मोठी खळबळजनक चर्चा सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने 'प्रहार जनशक्ती पक्षा'चे प्रमुख बच्चू कडू यांना पक्ष विलीनीकरणाची थेट ऑफर दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. 'प्रहार' पक्ष शिवसेनेत विलीन केल्यास बच्चू कडू यांना विधान परिषदेवर पाठवण्याची तयारी शिंदेंनी दर्शवली असल्याचे बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ एप्रिल रोजी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि बच्चू कडू यांच्यात सुमारे अर्धा तास महत्त्वाची बैठक पार पडली. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारीवरून बच्चू कडू यांनी काहीशी नाराजी व्यक्त केली होती. मात्र, आता विदर्भात, विशेषतः अमरावती विभागात शिवसेनेला जनआंदोलने उभी करणारा आणि तळागाळातील पकड असलेला एक आक्रमक चेहरा हवा आहे. बच्चू कडू यांची शेतकरी आणि दिव्यांगांमधील लोकप्रियता लक्षात घेता, त्यांना शिवसेनेत सामावून घेण्याचा शिंदेंचा मानस आहे. मात्र, स्वतंत्र पक्ष नको, तर अधिकृत शिवसैनिक म्हणून या, अशी अट ठेवण्यात आल्याने 'प्रहार'चे अस्तित्व आता धोक्यात येणार का? अशा चर्चांना उधाण आले आहे.

### बच्चू कडूंची सावध भूमिका

**या सर्व घडामोडींवर बच्चू कडू यांनी अद्याप ठोस भूमिका जाहीर केलेली नाही. कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेईन, असे म्हणत त्यांनी सध्या तरी सावध पवित्रा घेतला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे चार दिवस शिल्लक असताना, बच्चू कडू 'प्रहार'चा आवाज विधान परिषदेत नेण्यासाठी स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व विलीन करणार की स्वतंत्र राहून लढा सुरू ठेवणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी नीलम गोरे यांचे नाव निश्चित मानले जात असताना, दुसऱ्या जागेसाठी बच्चू कडूंच्या नावाची जोरदार चर्चा आहे. कर्जमाफी आणि शेतकरी प्रश्नांवर रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या कडूंची ताकद विदर्भात शिवसेनेचा विस्तार करण्यासाठी वापरण्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची ही मोठी राजकीय खेळी मानली जात आहे.

एकनाथ शिंदेंनी दिलेल्या या ऑफरमुळे महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या भाजपमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता असल्याची चर्चा आहे. अमरावतीच्या स्थानिक राजकारणातील संघर्ष पाहता, कडू यांच्यावर विविध गुन्हे दाखल करून किंवा तांत्रिक अडचणी निर्माण करून या प्रक्रियेत अडथळे आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात आहे.



# चौंडीचा चेहरामोहरा बदलणार

## ६८१ कोटींच्या विकास आराखड्याला गती!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई / अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून येणाऱ्या पिढीला प्रेरणा मिळावी, यासाठी त्यांच्या जन्मभूमीचा म्हणजेच चौंडीचा विकास सर्वसमावेशक आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. चौंडी येथील स्मृतिस्थळाच्या जतन, संवर्धन आणि विकास आराखड्याबाबत 'वर्षा' निवासस्थानी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

या प्रकल्पांतर्गत ६८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, चौंडी परिसरात भव्य पुतळा, सुशोभित उद्यान, नदीकाठाचा विकास, आधुनिक संग्रहालय आणि ओपन एअर थिएटर उभारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या परिसरात कायमस्वरूपी पाणी उपलब्ध होण्यासाठी जलव्यवस्थापनावर भर दिला जाणार असून, बुडीत बंधाऱ्यांऐवजी 'बॅरेज' उभारण्याबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.


### रोजगार निर्मितीचा मानस – प्रा. राम शिंदे

**विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, चौंडी विकास आराखड्यात इतिहास आणि आधुनिक पर्यटनाचा मेळ घातला जात आहे. यामुळे स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल आणि चौंडी हे देशातील एक प्रमुख आकर्षक पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला येईल.**

### नियोजनबद्ध विकासातून पर्यटनाला मिळणार मोठी चालना; मुख्यमंत्र्यांचे निर्देश



पर्यटनाला व्यावसायिक गती देण्यासाठी काही सुविधांची उभारणी व देखभाल 'खासगी भागीदारी'तून करण्याबाबत सरकार सकारात्मक आहे. यामुळे पर्यटकांना दर्जेदार आणि दीर्घकालीन सुविधा मिळतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३६० कोटींच्या रस्ते कामांचे आदेशही देण्यात आले असून, वन विभाग व ग्राम पंचायतीने संयुक्त मोजणी करून जागेच्या सीमा निश्चित केल्या आहेत.



या बैठकीस वित्त, पर्यटन, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ सचिव आणि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया उपस्थित होते.

# माकड पकडा अन् ६०० रुपये कमवा; राज्य सरकारचा जीआर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यात वाढत्या मानव-वानर संघर्षावर नियंत्रण मिळवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. वन विभागाच्या २२ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, संघर्षग्रस्त माकडे आणि वानरांना सुरक्षितपणे पकडून त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी आता प्रति माकड ६०० रुपये मानधन निश्चित करण्यात आले आहे.

हा निर्णय लोकप्रतिनिधींकडून वारंवार होत असलेल्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला असून यामध्ये आधीच्या आर्थिक मापदंडांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शहरांमध्ये त्रास देणाऱ्या रिझस मकाक आणि हनुमान लंगूर या वानरांना सुरक्षित जाळे किंवा पिंजऱ्यांच्या सहाय्याने पकडले जाणार आहे. पकडलेल्या प्रत्येक वानराची छायाचित्रासह नोंद ठेवली जाईल आणि त्यांना मानवी वस्तीपासून किमान १० किमी दूर जंगलात सोडले जाईल. शासन निर्णयानुसार, ही नवीन दररचना तात्काळ लागू करण्यात आली असून पूर्वीच्या आदेशातील इतर तरतुदी कायम ठेवण्यात आल्या आहेत. दरम्यान, मानवी वस्तीत त्रास देणारे माकड पकडण्याच्या या धोकादायक आणि आव्हानात्मक कामासाठी फक्त ६०० रुपयांचा दर पुरेसा आहे का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, माकडे पकडणे आणि सुरक्षितरीत्या स्थलांतर करणे हे अत्यंत कौशल्यपूर्ण काम असल्याने यासाठी अधिक निधीची गरज भासू शकते.

## संपादकीय

# गोदावरीचे अस्तित्व आणि जलक्रांतीचे स्वप्न

दक्षिण गंगा म्हणून पूजली जाणारी गोदावरी आज प्रदूषणाच्या विळख्यात आणि मानवी हस्तक्षेपाच्या ओझ्याखाली दबली गेली आहे. 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेच्या निमित्ताने सुरू झालेली जागृती ही केवळ धार्मिक विधी न राहता ती खऱ्या अर्थाने जलसंवर्धनाची लोकचळवळ बनायला हवी.

महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांची जीवनवाहिनी असलेली गोदावरी नदी आज आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. त्र्यंबकेश्वरच्या ब्रह्मगिरी पर्वतातून उगम पावणारी ही १६४५ किलोमीटर लांबीची 'दक्षिण गंगा' राज्याच्या ६०० किलोमीटरच्या प्रवासात लाखो हेक्टर जमीन सुजलाम सुफलाम करते. नाशिक ते धर्माबादपर्यंत या नदीने अनेक शहरे जगवली आणि औद्योगिक विकासाला दिशा दिली. मात्र, आज याच नदीचे पात्र बेसुमार वाळू उपसा, थेट सोडले जाणारे सांडपाणी आणि अतिक्रमणांमुळे नाल्यात रूपांतरित होताना दिसत आहे. ही केवळ एका नदीची दुरवस्था नाही, तर मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागाच्या भविष्यावरील टांगती तलवार आहे.

मराठवाड्यासाठी गोदावरी ही केवळ नदी नसून ती 'संजीवनी' आहे. जायकवाडी (पैठण), विष्णुपूरी (नांदेड) यांसारख्या मोठ्या प्रकल्पांमुळे या भागातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटला असला तरी, निसर्गाचे चक्र बदलत आहे. गोदावरी खोऱ्यात पडणारा पाऊस हा अत्यंत अनिश्चित झाला आहे. त्यातच नदीपात्रात नाशिक ते धर्माबादपर्यंत उभारलेले ३०० पेक्षा जास्त लहान-मोठे बंधारे पाण्याची वहनक्षमता रोखत आहेत. नदीचा नैसर्गिक प्रवाह खंडित झाल्यामुळे पाण्याचे शुद्धीकरण नैसर्गिकरीत्या होणे थांबले आहे.

दुसरीकडे, वाळूचा अवैध उपसा इतका वाढला आहे की नदीचा तळ उघडा पडला आहे, ज्यामुळे पाणी साठवून ठेवण्याची जमिनीची क्षमता संपली आहे. औद्योगिक प्रदूषण आणि शहरांमधील नाल्यांचे पाणी प्रक्रिया न करताच नदीत सोडले जात असल्यामुळे पाण्याचा दर्जा कमालीचा खालावला आहे. अलीकडेच नांदेडमध्ये आलेल्या 'पीआरसी' कमिटीतील आमदारांनी प्रशासनाला सुनावलेले खडे बोल हे या भीषण वास्तवाचे प्रतीक आहेत.

या पार्श्वभूमीवर राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून सुरू झालेली 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा आशेचा किरण ठरत आहे. जलकुंभांचे पूजन आणि ठिकठिकाणी होणारी जनजागृती यामुळे लोकांमध्ये जलसाक्षरता निर्माण होत आहे. ही चळवळ म्हणजे केवळ एका यात्रेपुरती मर्यादित न राहता, ती पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या 'पश्चिमेचे पाणी पूर्वेकडे' वळविण्याच्या स्वप्नाची पूर्तता करणारी ठरावी.

बाळासाहेब विखे पाटील यांनी आयुष्यभर पाण्यासाठी संघर्ष केला. त्यांचे स्वप्न होते की, पावसाळ्यात समुद्राला वाहून जाणारे अरबी समुद्राचे अतिरिक्त पाणी वळवून ते तहानलेल्या गोदावरी खोऱ्यात आणि मराठवाड्याच्या दुष्काळी पट्ट्यात पोहोचवावे. आज राज्य सरकारने नदीजोड प्रकल्पासाठी साडेतेरा हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे, ही या दिशेने टाकलेले ऐतिहासिक पाऊल आहे.

नदीजोड प्रकल्प राबविताना केवळ पाण्याचे मार्ग बदलून चालणार नाही, तर पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबाची साठवण कशी करता येईल, याचा शाश्वत विचार करावा लागेल. पावसाळ्यात गोदावरी दुथडी भरून वाहते, पण हे पाणी वेगाने समुद्राकडे निघून जाते. हे अतिरिक्त पाणी साठवण्यासाठी नवीन साठवण तलाव किंवा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे.

परंतु, हे प्रकल्प राबविताना प्रशासनापुढे सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे 'अस्तित्वात असलेल्या नद्यांचे पुनरुज्जीवन'. जर मूळ नद्याच प्रदूषित राहिल्या आणि त्यांचे पात्र गाळाने भरलेले राहिले, तर नदीजोड प्रकल्पातून येणारे शुद्ध पाणीही प्रदूषित होईल. औद्योगिक सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करणे आणि नदीपात्रातील अतिक्रमणे हटवणे ही आता 'आर या पार'ची लढाई आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या काळात जलव्यवस्थापनाचे उत्तम आदर्श घालून दिले होते. तलाव, विहिरी आणि बारवांच्या माध्यमातून त्यांनी लोकसहभागातून जलक्रांती घडवली होती. त्याच धर्तीवर आज आधुनिक जलक्रांतीची गरज आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना हीच अहिल्यादेवींची शिकवण आणि बाळासाहेबांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवावे लागेल.

नांदेड महापालिकेने गोदावरी शुद्धीकरणासाठी जो '१०० दिवसांचा कृती कार्यक्रम' हाती घेतला आहे, तो केवळ कागदावर किंवा 'दाखवण्यापुरता' राहू नये. प्रत्येक शहराने आपल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करूनच ते नदीत सोडले पाहिजे, हा नियम कठोरपणे पाळला गेला पाहिजे. तरच आपण येणाऱ्या पिढीला 'जिवंत गोदावरी' देऊ शकू.

गोदावरी ही केवळ तीर्थक्षेत्रांची जननी नाही, तर ती अर्थव्यवस्थेचा कणा आहे. 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेच्या निमित्ताने पेटलेली ही जनजागृतीची मशाल आता विझता कामा नये. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिमेचे पाणी पूर्वेकडे आणतानाच, गोदावरीच्या मूळ प्रवाहाचे पावित्र्य आणि आरोग्य जपण्याचे शिवधनुष्य प्रशासनाला आणि जनतेला मिळून पेलावे लागेल. तरच मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होईल आणि खऱ्या अर्थाने 'जलक्रांती' यशस्वी होईल.

# धीरेंद्र शास्त्री यांच्यावर तातडीने कारवाई करा जिल्हा काँग्रेसच्या वतीने प्रशासनाला निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अपशब्द वापरणाऱ्या धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्यावर तातडीने कारवाई करा तसेच आमदार संजय गायकवाड यांनी महिलांबद्दल अपशब्द वापरले त्यांच्यावर देखील त्यांच्यावर देखील कडक कारवाई करा अशा मागणीचे निवेदन जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने प्रशासनाला देण्यात आले आहे.



यावेळी आमदार हेमंत ओगले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहासाची मोडतोड करून चुकीच्या पद्धतीने महाराजांच्या संदर्भात वक्तव्य करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री यांचा निषेध करतो तसेच त्यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करावा अशी मागणी आमदार ओगले यांनी केली.

नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा जाणीवपूर्वक कोणीतरी पुसण्याचा प्रयत्न करत आहे वेळीच अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालावा लागेल असे म्हटले आहे.

जिल्हाध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल जाणीवपूर्वक अपशब्द वापरून इतिहासाची मोडतोड करणाऱ्या वीरेंद्र शास्त्री यांचा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मी निषेध करतो सगळ्यात गंभीर बाब म्हणजे हे वक्तव्य ज्यावेळी जितेंद्र शास्त्री यांनी केले त्याच व्यासपीठावर मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक देखील उपस्थित होते आणि त्यांच्या समोरच महाराजांचा अपमान होत असताना त्याचा विरोध न करता केवळ त्यांनी बघ्याची भूमिका घेतली तरी धर्मेंद्र शास्त्री यांच्यावर तातडीने कारवाई करा असे म्हटले.

निवेदनावर माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, मार्केट कमिटीचे सभापती सुधीर नवले, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, पंडित बोंबले, सभापती योगेश जाधव, दिपक वमने, अशोक शिवरकर, फिरोज शाह, सुभाष पोटे, कलीम कुरेशी, रितेश एडके, रवींद्र खिलारी, रज्जाक पठाण आदींच्या सह्या आहेत.

# महसूल सेवकांच्या मागण्यांबाबत महसूलमंत्र्यांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वि :** अहिल्यानगर जिल्हा महसूल सेवक संघटनेच्या वतीने महसूल सेवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात राज्याचे महसूलमंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना शिर्डी येथे सविस्तर निवेदन देण्यात आले. महसूल विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवावेत, या प्रमुख उद्देशाने हे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश करपे यांनी महसूल मंत्र्यांशी चर्चा करताना कर्मचाऱ्यांच्या कामाचा वाढता ताण आणि पदोन्नती तसेच महसूल विभागाचा आकृतीबंध तयार करण्यात आला त्यावेळी वाहन चालक व वर्ग ४ चे पद मृत घोषित करून सदरपद बाह्य यंत्रणांकडून भरणे बाबत नमूद केले आहे त्यानुसार सदरचे पद आहे पुनर्जीवित करणे बाबत विनंती केली आहे. इतर सेवाविषयक अडचणींकडे लक्ष वेधले. महसूलमंत्र्यांनी सर्व मागण्या सकारात्मकतेने ऐकून घेत त्याबाबत लवकरच योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ गाडेकर, सरचिटणीस पवन वाकचौरे यांच्यासह संतोष खोले, पोपट हासे, वसंत गायकवाड, चंद्रकांत भालेराव व इतर तालुकाध्यक्ष व जिल्हा संघटनेचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निवेदनात महसूल सेवकांच्या रिक्त पदांची भरती, वरिष्ठ श्रेणीतील पदोन्नती आणि इतर न्याय्य मागण्यांचा समावेश होता. ''प्रशासनाचा कणा असलेल्या महसूल सेवकांच्या समस्या सुटल्यास कामकाजात अधिक गती येईल,'' अशी भावना जिल्हा संघटनेने व्यक्त केली.

या प्रसंगी जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून आलेले महसूल सेवक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळीभानला जल यात्रेचे जंगी स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथे अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६ चे रविवारी दुपारी १२.३० वाजता उत्साहात आगमन झाले व माजी सभापती नानासाहेब पवार मित्र मंडळ, भाजपा व ग्रामस्थांच्या वतीने जलयात्रेचे जंगी स्वागत करत जलसंवर्धनाच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




टाकळीभान येथे गोदा ते नर्मदा जलयात्रेचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी, ढोल ताशांचा गजरात स्वागत करण्यात आले तसेच यावेळी बाल वारकर्यांची दिंडी, भाजपा कार्यकर्ते, माजी सभापती नानासाहेब पवार मित्र मंडळ व ग्रामस्थांनी स्वागत केले. या जलयात्रेत सहभागी झालेले डॉ. सुजय विखे व जलसंपदा विभागाचे अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ सुजय विखे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जन्मोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत, मंत्री राधाकृष्ण विखे तसेच गिरीश महाजन यांच्या पुढाकारातून जन्मभूमी चौंडी ते. कर्मभूमी महेश्वर असा या यात्रेचा प्रवास आखण्यात आला आहे. या यात्रेद्वारे पाण्याचे महत्त्व, जलसंधारणाची गरज आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीचा संदेश दिला जात असून महायुती सरकारचे सर्व मंत्री, आमदार आणि खासदार यामध्ये सक्रिय सहभाग घेत असून गोदा ते नर्मदा जलयात्रा ही जनजागृती आणि प्रेरणेचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी सभापती नानासाहेब पवार, माजी सरपंच चित्रसेन रणनवरे, शिवाजीराव धुमाळ, उपसरपंच कान्हा खंडागळे, सोसायटीचे माजी अध्यक्ष राहूल पटारे, सोसायटीचे उपाध्यक्ष अविनाश लोखंडे,अनिल दाभाडे, सुधीर मगर, भाऊसाहेब पवार, भाजपाचे बंडोपत हापसे, नारायण काळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षक कार्यालयावर वंचितचे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** जिल्ह्यात वंचित समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या घटनांमध्ये पोलीस प्रशासन निष्क्रिय असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. याच्या निषेधार्थ रविवार, दि. ११ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर 'जन आक्रोश धरणे आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.



पक्षाच्या वतीने पोलिसांवर गंभीर आरोप करण्यात आले असून, पीडितांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणे, गंभीर गुन्ह्यांमध्ये केवळ अदखलपात्र गुन्हा नोंदवून आरोपींना अभय देणे तसेच पीडितांवरच प्रति-गुन्हे दाखल करण्याचे प्रकार वाढल्याचा दावा करण्यात आला आहे. जिल्हाध्यक्ष योगेश साठे व उत्तर जिल्हाध्यक्ष संतोष चोळके यांनी माहिती दडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये गेल्या सहा महिन्यांतील एन सी प्रकरणांची यादी जाहीर करून त्यांचे एफ आय आरमध्ये रूपांतर करणे, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई, पीडितांवरील खोटे गुन्हे रद्द करणे आणि फरार आरोपींना अटक करण्यासाठी मुदत निश्चित करणे यांचा समावेश आहे.पक्षाचे राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण, उपाध्यक्ष दिशा पिंकी शेख, प्रवक्ते ॲड. अरुण जाधव व उत्कर्षा रुपवते यांच्या उपस्थितीत आंदोलन होणार आहे. मागण्यांवर लेखी उत्तर न मिळाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# मुख्य पाईपलाईन फुटल्याने देवळाली प्रवराचा पाणीपुरवठा विस्कळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील मुळा धरणातून देवळाली प्रवरा शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन अचानक फुटल्याची घटना घडली आहे. या बिघाडामुळे काही काळ शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला होता. मात्र प्रशासनाने तातडीने हालचाल करत युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे हाती घेतली असून पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पाईपलाईनमध्ये अचानक लिकेज झाल्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी आणि नगरपालिका पदाधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. तातडीने दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. ही पाईपलाईन देवळाली प्रवरा शहरासाठी मुख्य जीवनवाहिनी मानली जाते. त्यामुळे तिच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्यात आले असून काम पूर्ण होण्यासाठी संपूर्ण दिवस लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनास्थळी नगराध्यक्ष सत्यजित कदम, नगरसेवक अजित चव्हाण, सचिन शेटे, ऋषभ लोढा, मंगेश ढुस तसेच नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी धाव घेतली. प्रशासनाकडून नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# गीता परिवाराच्या संस्कार शिबिराला राहुरीत उदंड प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** येथील गीता परिवाराच्या वतीने मुलांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याला शहरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे .

श्री आचार्य गोविंद गिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने गीता परिवाराच्या वतीने मुलांसाठी संस्कार शिबिर आयोजित करण्यात येते . राहुरी शहरातील गोकुळ कॉलनी मधील योगा हाल येथे हे शिबिर २३ एप्रिल पासून सुरू झाले आहे . या शिबिरात भगवत गीता ,बोधकथा ,योगासने ,थोर पुरुषांचे जीवन चरित्र ,मनोरंजन ,रांगोळी ,आदी गोष्टी तज्ञ मार्गदर्शकाकडून घेण्यात येत आहेत .




या शिबिराला शहरातून मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले. २६ एप्रिल रोजी मुलांची प्रभात फेरी काढण्यात आली. योगा केंद्र ते शनि मंदिर मार्गावर मुलांनी घोषणा, फलक यासह हि फेरी पूर्ण करून हनुमान चालीसा पाठ केला. मंदिरात आदरणीय नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर यांनी मुलांना मार्गदर्शन केले. सदर शिबिराला काल संगमनेर येथील दत्ता भाऊ भांदुर्गे आणि यांनी सदिच्छा भेट दिली व अनेक नवीन खेळ घेतले. हे संस्कार शिबिर दिनांक ३० एप्रिल पर्यंत सुरू राहणार असून रोज खाऊ वाटप, आरती करून मुलं शिबिराचा आनंद घेत आहेत.दि २७ रोजी डॉ भंडारी यांनी मुलांचे दंत चिकित्सश्र शिबीर घेतले.रोज सुमारे ६० मुलांची उपस्थिती

असते तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी यात सहभागी व्हावे , असे आवाहन करण्यात आले आहे

# पेन्शनवाढीसाठी एकजूट आणि चिकाटी आवश्यक : दहिफळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** पेन्शनवाढीच्या मागणीसाठी पेन्शनधारकांनी एकजूट आणि चिकाटी कायम ठेवली तर हा प्रश्न निश्चित मार्गी लागेल, असे मत महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटना, श्रीरामपूरचे अध्यक्ष एस. एल. दहिफळे यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर येथील साखर कामगार हॉस्पिटल सभागृहात आयोजित वार्षिक सभेत ते बोलत होते.

दहिफळे म्हणाले की, मागील १२ वर्षांपासून पेन्शनवाढ न झाल्यामुळे पेन्शनधारकांवर अन्याय होत आहे. मात्र, धीर न सोडता सातत्याने प्रयत्न केल्यास पेन्शनवाढ मिळवणे शक्य आहे. शेती महामंडळ कामगारांनी न्यायालयीन लढ्याद्वारे चौथा आयोग लागू करून घेतल्याचा दाखला देत त्यांनी त्याप्रमाणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यासाठी संघटनेमार्फत कायदेशीर मार्गांचाही विचार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सरचिटणीस सुभाष कुलकर्णी यांनी पेन्शनवाढीसंदर्भात सविस्तर माहिती दिली. सरकारकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. अल्प पेन्शनमुळे औषधोपचार खर्च भागविणे कठीण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे आंदोलनासह विविध मार्गांनी हा प्रश्न जिवंत ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मेळाव्यात भिकन शिंदे, समशेर शेख, भालचंद्र कोल्हटकर, अशोक पाटील, बी. ए. काळे, सुधाकर चव्हाण, कारभारी त्रिभुवन आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध भागांतील पेन्शनधारक व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांनो व्याकरणातील बारकावे अभ्यासा : प्राचार्य सुंबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्तीच्या सर्व शाखेतील सर्व माध्यमांच्या इयत्ता पहिली ते बारावीच्या वर्गास अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांसाठी शिक्षण महर्षी साहेबराव घाडगे पाटील उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे मराठी व्याकरण या विषयावर श्री नृसिंह विद्यालय चास येथील मुख्याध्यापक श्री रंगनाथ सुंबे यांनी आपले मत प्रकट केले





मराठी भाषेचे नियम आणि ती भाषा शुद्ध स्पष्ट व अर्थपूर्ण पद्धतीने लिहिण्याची व बोलण्याची पद्धत ज्या शास्त्रात सांगितले जाते त्याला मराठी व्याकरण असे म्हणतात सोप्या शब्दात सांगायचे तर भाषा योग्य प्रकारे वापरण्यासाठी जे नियम बनवले आहेत त्याचा संच म्हणजे व्याकरण, असेही त्यांनी सांगितले. शुद्ध भाषा लिहिण्यासाठी व बोलण्यासाठी आपल्याला व्याकरण शिकणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये केवळ व्याकरनिक चुकांमुळेच विद्यार्थी नापास होतात.त्यामुळे सर्वांनी मराठी भाषेच्या व्याकरणाकडे लक्ष द्यावे असेही त्यांनी सांगितले. थोडक्यात व्याकरण म्हणजे भाषेचे संविधान आहे. जसे संविधानामुळे देश सुरळीत चालतो तसेच व्याकरणामुळे मराठी भाषा सोपी होते.

यावेळी व्याख्याते नृसिंह विद्यालय चास येथील मुख्याध्यापक रंगनाथ सुंबे यांचा सत्कार दादासाहेब हरिभाऊ घाडगे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सोपान काळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मानद विश्वस्त बाळासाहेब कोकरे सचिन कर्डिले,मनीषा राऊत,संतोष जावळे,प्राचार्य भाऊसाहेब दुधाडे,अरविंद देशमुख,श्रीदेवी नायर,संगीता झिंजुर्डे,विभागप्रमुख संतोष निंबाळकर व अध्यापक वर्ग उपस्थित होते. ार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक लक्ष्मण दळवी यांनी केले पसायदानाने उदबोधन वर्गाची सांगता झाली.

# सुनेकडे वाईट नजरेचा आरोप;

## व्यक्तीस मारहाण करून सोन्याची चैन लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सुनेकडे वाईट नजरेने पाहत असल्याचा आरोप करत एका व्यक्तीस फायटर व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून गळ्यातील सोन्याची चैन पळविल्याची घटना राहुरी तालुक्यातील रामपूर येथे घडली. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाबासाहेब भागवत साबळे (वय ५७, रा. रामपूर) हे महावितरणमध्ये कार्यरत असून शेतीही करतात. २२ एप्रिल रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास ते शेतात गेले असता आरोपी पुष्पा मोरे ही गवत तोडताना दिसून आली. त्यानंतर काही वेळातच आरोपींनी साबळे यांच्याकडे येऊन तु आमच्या सुनेकडे वाईट नजरेने का पाहतोस असा जाब विचारत त्यांना शिवीगाळ केली.

यानंतर आरोपींनी साबळे यांना घरासमोर ओढत नेऊन फायटर व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांची सोन्याची चैन हिसकावून घेतली. तसेच त्यांना जबरदस्तीने वाहनात बसवून ग्रामपंचायत कार्यालयात नेले, जिथे जमलेल्या लोकांसमोर पुन्हा मारहाण करण्यात आली.

या हल्ल्यात साबळे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर लोणी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून पुष्पा मोरे, संगीता मोरे, भाऊसाहेब मोरे, अजय मोरे, जॉकी मोरे व रंजित मोरे (सर्व रा. रामपूर) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे करीत आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## बुद्धांच्या समतेच्या विचारातून महिलांमध्ये नवचैतन्य

**आश्वी :** भगवान बुद्धांच्या समतेच्या विचारांनी प्रेरित होऊन महिलांमध्ये धम्मकार्यासाठी नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र आश्वी खुर्द येथे पाहायला मिळाले. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित बौद्धाचार्य श्रामणेर शिबिरातील भिक्खू संघासाठी पिंप्री लौकी अजमपूर येथील महिलांनी एकत्र येत भोजनदानाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. महिलांनी पुढाकार घेत गावातील प्रमुख रस्त्यांवरून भिक्खू संघाची मिरवणूक काढली. मुलींनी पुष्पवृष्टी करत स्वागत केले, तर महिलांनी पाय धुवून भिक्खूंचा सन्मान केला. त्यानंतर महिलांनी स्वतः तयार केलेले सुग्रास भोजन भक्तिभावाने अर्पण केले. या उपक्रमात वंदना कदम, माया कदम, मनिषा कदम, सुनिता कदम, सविता कदम यांच्यासह अनेक महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशासाठी स्थानिक महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत एकात्मतेचे दर्शन घडवले.

## पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे यांनी विकासाचा प्रवरा पॅटर्न मांडला



**लोणी :** महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा पाया रचणारे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडवून आणणारे महर्षी म्हणजे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील होत. त्यांच्या अथक परिश्रमातूनच आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा राहिला, ज्याने संपूर्ण देशासमोर विकासाचा एक नवीन प्रवरा पॅटर्न मांडला, असे प्रतिपादन आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रशांत सारदे यांनी केली. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रवरा मेडिकल ट्रस्ट आणि प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) यांच्या वतीने आज त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ परिसरातील पद्मश्रींच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील आणि विश्वस्त ध्रुव विखे पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी कुलगुरू प्रो. डॉ. विष्णू मगरे, कुलसचिव डॉ. रवींद्र लावरे, डॉ. गणेश आहेर, डॉ. अमित मणी, सचिन गोर्डे, अमोल सरगर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# दुष्काळी भागाला जलमय करण्यासाठी

## 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा महत्वाची : ना.राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** महायुती शासनाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळ मुक्त करण्यासाठी अनेक उपाय योजना करण्यात आल्या आहे. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचा या उद्देशातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी जी जल क्रांती केली आज तीच जल क्रांती करण्याची गरज असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील दुष्काळी भागाला जलमय करण्यासाठी ही 'गोदा ते नर्मदा' जल यात्रा महत्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी कोपरगाव येथे केले.



राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेचे सोमवार (दि.२७) रोजी कोपरगाव नगरीत आगमन झाले. यावेळी श्री साईबाबा तपोभूमी येथे आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव मतदार संघातील जनतेच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी पवित्र जल कलशावर फुलांची उधळण करून कलशाचे विधिवत पूजन केले. शिर्डी कडून येणाऱ्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे कोपरगाव शहरामध्ये ढोल ताश्यांच्या गजरात, फटाक्यांच्या अतिशबाजीत आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी रस्त्यांवर ठिकठिकाणी 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेच्या स्वागतासाठी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.

यावेळी या 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेसोबत जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार रामराम वडकुते, आ. गोपीचंद पडळकर, आ. सदाभाऊ खोत आदी मान्यवर होते. यावेळी बोलतांना आ. आशुतोष काळे म्हणाले की, अत्यंत कुशल, दूरदर्शी आणि प्रजाहितदक्ष शासक अशी ओळख असणाऱ्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या काळात जलव्यवस्थापनाला विशेष प्राधान्य दिले होते.

पाणी हे उद्याचे भविष्य असून राज्याला दुष्काळ मुक्त करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी ३०० वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे जलसंधारण आणि जल व्यवस्थापनाच्या बाबतीत पाण्याचा थेंब अन् थेंब जपून वापरण्याचा संदेश दिला, जो आजही अनुकरणीय आहे. तोच वारसा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेच्या माध्यमातून पुढे घेवून जात असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी समता पतसंस्थेचे संस्थापक-अध्यक्ष काका कोयटे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन प्रवीण शिंदे, माजी व्हा.चेअरमन पद्माकांत कुदळे, काकासाहेब जावळे, तसेच कारखाना व उद्योग समुहाचे चेअरमन, व्हा. चेअरमन, सर्व संचालक, पदाधिकारी, सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, गोदाकाठचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिंचपूर येथे मोफत स्त्रीरोग व बालरोग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर व परवडणाऱ्या आरोग्य सेवांचा लाभ मिळावा या उद्देशाने चिंचपूर येथे आयोजित मोफत स्त्रीरोग व बालरोग आरोग्य शिबिरास ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला. पायरेन्स डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, चिंचपूर सेवा संस्था आणि जनसेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले.

महिला व बालकांच्या आरोग्य समस्यांचा विचार करून स्वतंत्र तपासणी व्यवस्था करण्यात आली होती. बालरोग तज्ज्ञ डॉ. योगेश निघुते यांनी बालकांची सखोल तपासणी करून पालकांना पोषण, लसीकरण व बालसंगोपनाबाबत मार्गदर्शन केले. तर स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अमृता घुगरकर यांनी महिलांच्या विविध तक्रारींची तपासणी करून आवश्यक उपचार व सल्ला दिला.शिबिरात रक्तदाब, वजन, सर्वसाधारण तपासणी, औषध वितरण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. महिलांनी आपले आरोग्य प्रश्न मोकळेपणाने मांडत तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले, तर पालकांनी बालकांच्या तपासणीसाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या उपक्रमासाठी ना. राधाकृष्ण विखे पाटील, सौ. शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील व डॉ. निलेश बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

## पद्मश्री विखे यांची पुण्यतिथी उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** श्री छत्रपती शिवाजी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाथरे बुद्रुक तालुका राहाता जिल्हा अहिल्यानगर संकुलात सहकाराचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे यांची ४६ वी पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आबासाहेब घोलप हे होते.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बारगुजे सर यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना संबोधित केले. पद्मश्रींच्या दूरदृष्टीमुळे सहकार,



औद्योगिक, वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय विकास झाला. याची नोंद संपूर्ण देशाने नव्हे तर संपूर्ण जगाने घेतली आहे.आज ग्रामीण भागामध्ये सर्व विभागाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहे. इंग्रजी माध्यम, सीबीएससी सैनिक स्कूल, विशेषतः मुलींसाठी अत्याधुनिक वस्तीगृह सुविधेसह शिक्षणाची सुविधा केली. त्यामुळे प्रवरा परिसर सुजलम सुफलाम झाला आहे.यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष आबासाहेब घोलप, शिवाजी नरहरी घोलप यांचे सह विद्यालयाचे प्राचार्य बारगुजे, कनिष्ठ महाविद्यालयाचे इनचार्ज डॉ. संदीप म्हस्के, प्राध्यापक संजय मस्के, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक घुगे सर्व शिक्षक - शिक्षिका उपस्थित होते.

## संवर्धित शेतीसाठी संशोधन करार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राज्यातील शेती अधिक हवामान-तगडी (क्लायमेट रेसिलियंट) करण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संवर्धित शेतीसाठी महत्त्वपूर्ण संशोधन करार करण्यात आला आहे. लोकभवन, मुंबई येथे झालेल्या या सामंजस्य करारामुळे राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये पुढील तीन वर्षे व्यापक संशोधनाला गती मिळणार आहे.

या संशोधनासाठी भारतीय मृदा विज्ञान संस्था, भोपाळ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा सहभाग राहणार आहे. करार सोहळ्यावेळी प्रकल्प संचालिका मिनल करणवाल, विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, संशोधन संचालक आणि मृदाविज्ञान तज्ज्ञ उपस्थित होते.

जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी शून्य मशागत ही संवर्धित शेतीपद्धती प्रभावी ठरत असल्याचे जागतिक स्तरावर सिद्ध झाले आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात (२०१९२०२४) शेतकरी प्रशिक्षणांद्वारे या तंत्राचा प्रसार करण्यात आला होता. मराठवाडा व विदर्भातील अनेक शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन, मका, तूर व हरभरा पिकांमध्ये शून्य मशागत पद्धती अवलंबून चांगले उत्पादन घेतल्याचे दिसून आले आहे.या पद्धतीमुळे उत्पादन खर्चात बचत, उत्पादनवाढ आणि जमिनीच्या गुणधर्मांमध्ये सुधारणा झाल्याचे निष्पन्न झाले असले तरी संबंधित पिकांसाठी अधिकृत शिफारसींचा अभाव जाणवत होता. या पार्श्वभूमीवर सखोल संशोधनाची गरज लक्षात घेऊन हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.विशेष म्हणजे हे संशोधन केवळ विद्यापीठांच्या परिसरापुरते मर्यादित न राहता, २१ जिल्ह्यांतील ८४ गावांमधील २५२ निवडक शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष राबविण्यात येणार आहे. सहभागीय पद्धतीने होणाऱ्या या संशोधनामुळे तंत्रज्ञानाचा प्रसार वेगाने होऊन शेतकऱ्यांना त्वरित लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील शेती अधिक शाश्वत, हवामानअनुकूल आणि मृदास्वास्थ्यदृष्ट्या सक्षम होण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

## चार महिन्यापासून पाणी नाही; करुलेतील महिलांनी विचारला जाब

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** करुले ग्रामपंचायतला प्रत्येक महिन्याची येणारी नळपट्टी भरून भरून सुद्धा गावाला पाणीपुरवठा होत नाही. त्या मुळे संतप्त झालेल्या महिला व ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाला पाण्याबाबत काय उपाय योजना केली याचा ग्रामसभेत जाब विचारत ग्रामपंचायत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले

संगमनेर तालुक्यातील करुले गावात गेल्या चार महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असल्यामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. महिलांना हंडाभर पाण्या साठी वणवण भटकंती करावी लागत आहे पाण्याच्या मुद्द्यासह विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी ग्राम सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या ग्रामसभेत पाण्याचा मुद्दाच



### सोमवार पासून पाण्याचा टँकर सुरू करू

गावातील ग्रामस्थांनी आपले प्रश्न व मुद्दे मांडावेत,यावर विचारविनिमय करण्यासाठी ग्रामसभा असते. त्या मुळे ग्रामस्थांनी आपले जे काही मुद्दे असतील ते मांडावेत ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने त्यावर योग्य तोडगा काढला जाईल. गावातील पाण्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेता लक्षात घेता ग्रामपंचायतीच्या वतीने , सोमवारीपासून गावासाठी पाण्याचा टँकर सुरू केला जाईल. **-बाळासाहेब आहेर, सरपंच ग्रामपंचायत करुले**

सर्वाधिक गाजला. ग्रामपंचायतीच्या वतीने पाण्यासाठी कुठलीही उपाय योजना केली नसल्यामुळे नाईलाजा सत्व करूले ग्रामस्थांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. मात्र या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी ग्रामसभेत केला. महिला ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत, आम्हाला इतर कोणत्याही सुविधा नकोत, फक्त पिण्याचे पाणी द्या, अशी जोरदार मागणी केली.

### अन्यथा ग्रामपंचायतीला टाळे ठोकू....

आम्हाला दुसरे काही नको, फक्त पाणी द्या, अशी संतप्त मागणी महिलांनी ग्रामसभेत केली . त्यावर सरपंच बाळासाहेब अहिरे यांनी सोमवारी टँकर सुरू करण्याचे आश्वासन दिले. मात्र जर सोमवारी पाण्याचा टँकर सुरू झाला नाही, तर ग्रामपंचायतीला टाळे ठोकू, असा इशारा करुले येथील संतप्त झालेल्या महिला ग्रामस्थांनी दिला.

## महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांचा महिलांकडून निषेध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांचा नेवासा तालुक्यातील महिलांकडून निदर्शने करत निषेध करण्यात आला. रत्नमालाताई लंघे व तेजश्रीताई नवले-लंघे यांनी महिलांच्या या निषेध आंदोलनाचे नेतृत्व केले

यावेळी बोलतांना रत्नमालाताई लंघे म्हणाल्या की देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने नारी शक्ती वंदन विधेयक २०२६



लोकसभेत सादर करण्यात आले. परंतु विरोधी पक्षांनी यामध्ये विनाकारणच्या शंका उपस्थित करून विरोध दर्शवला. यामुळे तालुक्यात महिलावर्ग प्रचंड नाराज झाला असून स्वतःचा हक्क डावलला गेल्याची व समस्त महिलांवर अन्याय झाल्याची भावना स्पष्ट केली.तेजश्रीताई नवले यांनी विरोधी पक्षाच्या या भूमिकेचा निषेध केला. विरोधकांच्या महिला आरक्षण विरोधी भूमिकेचा विरोध व निषेध व्यक्त करण्यासाठी व आपल्या हक्काचे राजकीय आरक्षण मिळावे यासाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे तहसील कार्यालयावर पोहचून निदर्शने करून आपला निषेध व्यक्त केला. यावेळी अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे यांना निवेदन देण्यात आले. निदर्शने आंदोलन प्रसंगी डॉ. वैशाली घुले,भाजपा महिला शहराध्यक्ष नीता कडू, भाजप महिला प्रमुख मंगलताई काळे, शिवसेना महिला तालुका प्रमुख शोभा आलवणे यांच्यासह महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## कमी पाण्याची पिके स्वीकारा : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी पाण्याचे योग्य नियोजन करत कमी पाण्यावर येणारी पिके स्वीकारावीत, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले. कृषी विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन येथे आयोजित खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, सहाय्यक वनसंरक्षक अमरजित पवार, तहसीलदार धीरज मांजरे, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.आ. खताळ यांनी सांगितले की, दरवर्षी विविध विभागांच्या बैठका घेतल्या जातात; मात्र त्या केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे.

हवामान बदलाचे संकट केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगासमोर उभे ठाकले आहे. त्यामुळे दीर्घकालीन जलनियोजन करत शेती पद्धतीत बदल स्वीकारणे काळाची गरज आहे. पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञान, कमी पाण्यात येणारी पिके आणि पर्यायी शेती पद्धतींचा अवलंब करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

**नावात बदल**

माझ्या १० वी च्या मार्कशीटवर माझे नाव **GAWLE NEETA JEEWAN** असे आहे व माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वर माझे नाव **NEETA JEEWAN GAWALE** असे आहे तरी **GAWLE NEETA JEEWAN** आणि **NEETA JEEWAN GAWALE** या दोन्ही नावाची दोन व्यक्ती नसून मी एकच आहे आधार नं ८२५३ ९४०४ १३४०

# गैहिनीनाथ महाराज यात्रोत्सवाची सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कुकाणा :** नेवासा तालुक्यातील पाचेगाव येथील सर्वधर्मीय ग्रामस्थांचं ग्रामदैवत श्री गहिनीनाथ महाराजांच्या यात्रा उत्सवाची भव्य कुस्तीच्या आखाड्याने मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली.

पाचेगाव येथील गहिनीनाथ महाराज यात्रा उत्सव ग्रामस्थांच्या उदात्त अंतकरणातून दिलेल्या देणगीमुळे गेल्या अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या यात्रेत गंगाजल मिरवणूक, जलभिषेक, झेंडा मिरवणूक, छबीना मिरवणूक, शोभेच्या दारुच्या आतीशषबाजीचा सामना,तमाशा, आर्केस्ट्रा, कुस्त्यांचा हगामा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलं होतं.

पाचेगाव परिसरात सर्वात मोठा यात्रा उत्सव म्हणून या यात्रा उत्सवाची ओळख असल्याने परिसरातून हजारो



भाविक तसेच यात्रा शौकीन या यात्रेसाठी येत असतात. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय असल्याने यात्रेमध्ये संसार उपयुक्त वस्तू तसेच खेळणीचे सामान खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने या यात्रेनिमित्त अनेक व्यावसायिक आपला व्यवसाय करण्यासाठी आले होते. ग्रामदैवत गहिनीनाथ महाराजांच्या यात्रेनिमित्त ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात देणगी दिली जात असल्याने यात्रा उत्सवाची दिवसेंदिवस वृद्धी होत आहे.

त्यामुळे देणगी देणाऱ्या सर्व देणगीदारांचे गावातील अशोक कारखान्याचे संचालक बाळासाहेब शिंदे गावचे सरपंच वामनराव तुवर माजी सरपंच दिगंबरराव नांदे, रमेश राजगुरू,अविनाश सोनवणे, शशिकांत मतकर, श्रीकांत पवार, दत्तात्रय पाटील, भगीरथ पवार, पंढरीनाथ शिंदे, दिगंबर तुवर, ज्ञानेश्वर वीर या प्रमुख मान्यवरांकडून सर्वांचे आभार मानण्यात आले. कुस्त्यांच्या झालेल्या हगाम्यामध्ये शेवटच्या कुस्ती विजेत्यास पाच हजार शंभर रुपयांच इनाम देण्यात आल यावेळी अमोल शिंदे, सचिन शिंदे, दीपक शिंदे,मंजाबापु माळी, दत्तात्रय पवार, उमेश कहार, सोमा मोरे, संदीप नांदे, गोकुळ तुवर, संदीप पाटील, दिगंबर कहार, कृष्णा पंढुरे, प्रभाकर तुवर, अशोक मतकर, गंगाधर मतकर, डॅनियल देठे, अनिल गायकवाड आदी उपस्थित होते. यात्रेदरम्यान पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अशोक लिपणे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल कर्डीले यांनी सलग तीन दिवस चोख बंदोबस्त ठेउन टवाळखोरांवर बारीक नजर ठेवल्याने यात्रा उत्सव शांततेत पार पडला.

**चौकशीची जाहीर नोटीस**

जा.क्र. /१२६६/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर, नवीन प्रशासकीय इमारत, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहिल्यानगर -४१४००३
दिनांक १५/०४/२०२६

स्किम अर्ज क्र.१४/२०२६/५०अ(१)
**संस्थेचे नाव :** श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान मु.पो.हातगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर
नोंदणी क्र.अे-१६३९ (अहिल्यानगर)
**अर्जदार-१. विनोद माणिकराव निर्मळ २. गणेश बाबासाहेब गावडे**

याबाबत सर्व संबंधित व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा.धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर हे वर नमूद केलेल्या स्किम अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० चे कलम ५० अ(१) अन्वये चौकशी करणार आहे. १. उपरोक्त अर्जदारांनी नमूद न्यासास पूर्वी कोणतीही घटना (नियम व नियमावली) अस्तित्वात नसलेने न्यासाचे कार्य प्रभावीपणे व जोमाने करण्यासाठी उपरोक्त स्किम अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे. २. **सभासदत्व :-** या न्यास संस्थेचे एक विश्वस्त मंडळ असेल. विश्वस्त मंडळामध्ये १८ वर्षावरील मौजे हातगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर गावचा रहिवासी असलेली व हिंदू धर्मातील धनगर समाजातीलच व देवस्थानावर श्रद्धा असलेली व न्यासाच्या मंदिरामध्ये नियमित दर्शन घेणारी व्यक्ती देवस्थानचा सभासद होण्यास पात्र राहील. एखाद्या व्यक्तीस न्यासाचे सभासदत्व द्यावयाचे की नाही किंवा त्यास विश्वस्त मंडळात सामावून घ्यावयाचे की नाही याबाबत विश्वस्त मंडळाचा निर्णय अंतिम राहील. सभासदांनाच निवडणूक लढवता येईल. तसेच मतदान करण्याचा अधिकार राहील. सभासद होणेसाठी आलेला अर्ज मंजूर करणे, किंवा नामंजूर करणे इ.अधिकार विश्वस्त मंडळास राहील. विश्वस्त मंडळ पात्र सभासदांची यादी तयार करतील. ती यादी वेळोवेळी अद्ययावत करण्यात येईल. विश्वस्त व सभासदांचे वार्षिक सभेचे १५ दिवस अगोदर यादी अद्यावत करून न्यासाचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. न्यासाच्या ज्या वार्षिक सभेत निवडणूक घ्यावयाची आहे किंवा पदधिकारी निवडावयाचे आहेत त्या वार्षिक सभेचे १५ दिवसापूर्वी सदर यादीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही. सभासद फी १०००/- रुपये असेल. ३. **विश्वस्तांची निवड व कालावधी :- पुढील बाबी पूर्ण केल्यास त्यास विश्वस्त म्हणून पात्र राहील.** १) सभासदाचे वय कमीत कमी १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे २) त्यास धार्मिक व सामाजिक कामाची आवड असली पाहिजे ३) त्यास कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात तुरुंगवासाची शिक्षा झालेली नसली पाहिजे ४) तो कलम ०४ प्रमाणे देवस्थानचा सभासद पाहिजे या न्यासाचे व्यवस्थापनासाठी विश्वस्त मंडळ कमीत कमी ०७ व जास्तीत जास्त १५ विश्वस्ताचे राहील. त्यात पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश राहील. अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सचिव-१, उपसचिव-१, खजिनदार-१ व उर्वरीत विश्वस्त राहतील. विश्वस्त मंडळाचा कालावधी ५ वर्षाकरिता असेल. विश्वस्त मंडळ दर ५ वर्षांनी सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान पद्धतीने बहुमताने सभासदामधून निवडले जाईल. तसेच एखाद्या विश्वस्तांची जागा एखाद्या कारणाने रिकामी झाली असल्यास सदर रिकाम्या जागी नवीन विश्वस्तांची नेमणूक उरलेली विश्वस्त हे विश्वस्त मंडळ सभेत करतील. नवीन विश्वस्तांची मुदत त्या वेळच्या विश्वस्तांच्या उर्वरीत कालावधीपुरतीच नेमणूक केली जाईल व नियोजित पदसंख्या पूर्ण करून घेण्यात येईल. सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्यांची लेखी हरकत, कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या लेखी हरकत, कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत लेखी हरकत, कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून वरील प्रकरणाची चौकशी पूर्ण केली जाईल व स्कीम अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश/हुकुम दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उपआयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्क्यानिशी आज दि.१५/०४/२०२६ रोजी दिली.

वरिष्ठ लिपीक

शिक्का

अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

# पान १ वरुन

## वन कर्मचाऱ्याला झाडाला बांधून चंदनाच्या झाडाची चोरी

आडगांव माऊली, खामगांव, पळसे या परिसरामध्ये सलग ५ दिवस शोध घेवुन आरोपी मसीद नसीब गोलवाल (वय २४ ) व शाहीदखा अलीखा कलेसे (वय २६ ) यांना अतिसंवेदनशील भागातुन अटक केली. त्यांच्याकडे सखोल व बारकाईने विचारपुस करता त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे साथीदार असलमखा भुरेखा पठाण (रा. म ाहुली, आडगांव, सरक, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, व नसीबखा मुनीरखा जोनवाल यांनी मिळुन केला असल्याची कबुली दिली. फरार आरोपींचा शोध घेता ते मिळुन आलेले नाही. या गुन्ह्यातील आरोपींनी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या खंडपीठ येथुन सुध्दा चंदनाचे झाडाची चोरी केलेली आहे . या गुन्ह्यामध्ये फरार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

.............

## बेलापूरच्या भोंदू गणेश बाबाला बेड्या!

मागणी करायचा. आतापर्यंत या महिलेकडून त्याने तब्बल १८ ते २० लाख रुपये उकळले आहेत. ऑगस्ट २०२५ आणि जानेवारी २०२६ मध्येही त्याने पीडितेच्या घरी आणि आश्रमात तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले. अपर पोलीस अधीक्षकांचा 'दणका'; भोंदूचे धाबे दणाणले

अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून स्वतः ला देवमाणूस म्हणवून घेणाऱ्या भोंदू बाबांनी उच्छाद मांडला होता. मात्र, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी अशा गुन्हेगारांविरुद्ध कडक मोहीम उघडली आहे. अशोक खरात आणि गडगेबाबानंतर आता गणेश बाबाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात याप्रकरणी बलात्कार आणि जादुटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## बिर्याणी आणि कलिंगड खाल्ल्याने विषबाधा, एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**मुंबई :** शहरातील पायधुनी परिसरात विषबाधेमुळे एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

मृतांमध्ये अब्दुल्ला डोकाडिया (४०), नसरीन डोकाडिया (३५) तसेच त्यांच्या दोन अल्पवयीन मुली आयशा (१६) आणि झैनब (१३) यांचा समावेश आहे. मुंबई पोलीस यांनी दिलेल्या माहितीनुसार, फूड पॉइझनिंगमुळे हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पायधुनी येथील घाटी गल्लीतील मुघल बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या डोकाडिया कुटुंबीयांनी शनिवारी रात्री नातेवाईकांसह जेवण केले होते. जेवणात त्यांनी प्रथम बिर्याणी खाल्ली आणि त्यानंतर कलिंगड खाल्ले होते. दुसऱ्याच दिवशी कुटुंबातील सर्वांना उलट्या, जुलाब, चक्कर आणि पोटदुखी यांसारखी लक्षणे जाणवू लागली.

प्रकृती खालावत गेल्याने त्यांनी फॅमिली डॉक्टरकडे धाव घेतली. डॉक्टरांनी त्यांना तत्काळ जेजे रुग्णालय येथे जाण्याचा सल्ला दिला. रुग्णालयात दाखल केल्यानंतर एका मुलीला डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यानंतर काही तासांतच दुसऱ्या मुलीचा मृत्यू झाला. पुढील काही वेळातच पालकांचाही मृत्यू झाला.

या घटनेपूर्वी कुटुंबातील एका व्यक्तीने पोलिसांना दिलेल्या जबाबात त्यांनी बिर्याणी आणि कलिंगड खाल्ल्याची माहिती दिली होती. अन्नातून विषबाधा झाली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. चारही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले असून अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, मुंबईतच घाटकोपर परिसरात आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नित्यानंद नगर भागात दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची मागणी

**अहिल्यानगर :** अनुसूचित जातींमधील सर्व घटकांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले असल्याची माहिती निमंत्रक विकास उडाणशिवे यांनी दिली. निवेदनात म्हटले आहे की, राज्यघटनेनुसार अनुसूचित जातींसाठी आरक्षणाची तरतूद असली तरी त्याचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. काही जातींपर्यंतच हा लाभ केंद्रित झाल्याने इतर घटकांमध्ये नाराजी आहे. कचरा वेचक तसेच कागद, काच, पत्रा गोळा करणाऱ्या कष्टकरी बांधवांमध्ये मांग समाजाचा मोठा सहभाग असून ते अजूनही हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. शिक्षण, आरोग्य व सामाजिक सुरक्षेपासून ते वंचित असल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# जलव्यवस्थापन उपक्रमासाठी जनतेच्या सक्रीय सहभागाची गरज : ना. विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव :** राज्यातील सिंचन व बिगर सिंचनाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न शासनामार्फत केले जात आहेत. मात्र जनतेचा सक्रीय सहभाग आणि सहकार्य मिळाल्याशिवाय पाण्याचे प्रश्न संपणार नाहीत. भविष्यातील पाण्याचे गांभिर्य लक्षात घेऊन जनतेने शासनाच्या जलव्यवस्थापन उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संवत्सर येथील जलयात्रेच्या स्वागत कार्यक्रमातून केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून राज्याच्या जलसंपदा विभागामार्फत जल व्यवस्थापन कृती पंधरवाड्यांतर्गत जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून दि. २५ ते २९ एप्रिल २०२६ या दरम्यान गोदावरी ते नर्मदा जलयात्रेचे आयोजन करण्यात आले असून या यात्रेचे सोमवारी कोपरगांव तालुक्यातील संवत्सर येथे आगमन झाले. यावेळी फटाक्यांच्या आतशबाजीत व फुलांच्या वर्षावात जलरथाचे स्वागत करण्यात आले. ना. विखे पाटील यांच्यासमवेत राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते, आ. गोपीचंद पडळकर, शेतकरी नेते व माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांचीही प्रमुख उपस्थिती होती. संवत्सर चौकामध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्वागत कार्यक्रमात प्रारंभी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुण्यस्मरणानिमित्त प्रतिमेचे पूजन ना. विखे पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेश परजणे पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संत जनार्दन स्वामी आश्रमाचे महंत रमेशगिरीजी महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रमाचे महंत परमानंदजी महाराज, संवत्सर महानुभाव आश्रमाचे महंत राजधरबाबा यांनी संयुक्तरित्या ना. विखे पाटील यांचा सत्कार केला.

जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, पाण्याचा योग्य वापर आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठीचा संदेश देण्याच्या उद्देशाने जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाच्या सक्रीय सहभागातून जलसंवर्धनाची चळवळ अधिक बळकट होऊन राज्यभर जलव्यवस्थापन, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा व्यापक संदेश या जलयात्रेतून देण्यात येत असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले. जलयात्रा ही केवळ यात्रा नाही तर, पाणी वाचविण्यासाठी सामुहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी एक ऐतिहासिक आणि व्यापक अशी चळवळ आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य असल्याचा संदेश या जलयात्रेद्वारे समाजातील प्रत्येक माणसांपर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत असेही ना. विखे पाटील यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

महाराष्ट्रातील शेती सिंचनाच्या पाण्यासाठी पद्मभुषण माजी केंद्रीयमंत्री बाळासाहेब विखे पाटील, कै. गणपतराव देशमुख, कोपरगांवचे नेते स्व नामदेवराव परजणे आण्णा यांनी सतत पाठपुरावा केला, अनेक आंदोलने केली याचीही आठवण ना. विखे पाटील यांनी यावेळी करुन दिली.

जलयात्रेच्या स्वागतासाठी नानासाहेब सिनगर, खंडू फेपाळे, सोमनाथ निरगुडे, एस. के. थोरात, बाळासाहेब थोरात, गोपीनाथ केदार, सोपान चांदर, बद्रीनाथ वलटे, कैलास मढवे, सीताराम कांडेकर, यशवंतराव गव्हाणे, अशोकराव काजळे, रोहीत टेके, राजेंद्र काजळे, प्रभाकर घाटे, गोरखनाथ शिंदे, जगदीप रोहमारे, भिकाजी झिंजुर्डे, भाऊसाहेब कदम, दत्तात्रय शितोळे, सुदाम शिंदे, सुदामराव कोळसे, सयराम कोळसे, भास्कर दुकळे, नामदेव शिंदे, नामदेव पावडे, भिकाजी कर्पे यांच्यासह पाटबंधारे विभाग, पंचायत समितीचे अधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते. संवत्सरचे उपसरपंच विवेक परजणे यांनी आभार व्यक्त केले.

# विलास लवांडे विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** वारकरी संप्रदायातील पूजनीय संत-महंतांविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्या विलास लवांडे यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीसाठी गंगापूर तालुक्यातील समस्त वारकरी संप्रदायच्या वतीने गंगापूर तहसीलदार यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की वारकरी संप्रदायाच्या हा महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा कणा आहे. या संप्रदायाने शतकानुशतके समता, बंधुता आणि नैतिकतेची शिकवण दिली आहे.नुकतेच विलास लवांडे नामक व्यक्तीने वारकरी संप्रदायात घुसखोरी झाल्याचे धादांत खोटे आणि बिनबुडाचे आरोप केले आहेत.

**या वक्तव्याद्वारे त्यांनी वारकरी संप्रदायातील**

ऋषितुल्य व्यक्तिमत्व पूजनीय भास्करगिरीजी बाबा, महंत रामगिरीजी महाराज, ह.भ.प. संजय महाराज पाचपोर आणि संत ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त योगी निरंजनजी यांच्यासारख्या आदरणीय व्यक्तींना घुसखोर संबोधण्याचे अत्यंत हीन कृत्य केले आहे. सदर विधान हे केवळ व्यक्तींवर केलेली टीका नसून, संपूर्ण वारकरी संप्रदायाची प्रतिमा मलिन करण्याचा आणि भाविकांच्या धार्मिक भावना दुखावणारा हा एक जाणीवपूर्वक केलेला कट आहे. अशा प्रक्षोभक आणि बेताल वक्तव्यांमुळे समाजात अशांतता निर्माण होऊ शकते आणि वारकरी भाविकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे. आयुष्यभर समाजाला सन्मार्ग दाखवणाऱ्या संत-महंतांचा असा अपमान करणे अत्यंत निषेधार्ह आहे.वारकरी संप्रदायाची बदनामी करणाऱ्या आणि संतांचा अवमान करणाऱ्या विलास लवांडे याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारे आध्यात्मिक परंपरेवर आणि श्रद्धास्थानांवर चिखलफेक करण्याचे धाडस कोणाकडूनही होणार नाही अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली यावेळी महंत स्वामी नारयणानंदगिरीजी धर्माचार्य डॉ. जनार्दन महाराज मेटे, महाराज,पुजनिय योगिराज दादा महाराज वायसळ, पूजनीय बाळकृष्ण महाराज दिघे, ह.भ.प.विजय महाराज खेडकर, गिरजीनाथ महाराज जाधव, बबन महाराज चौरे, किशोर महाराज निकम, विशाल महाराज जाधव, कृष्णा महाराज भवर, कैलास शास्त्री महाराज, विशाल जाधव महाराज, रोहित शेजुळ महाराज, अनिल वल्ले महाराज, नारायण शास्त्री महाराज ,गणेश कारभार महाराज, विजयदास खेडकर महाराज ,किशोर निकम महाराज, कृष्णाजी मुळे महाराज ,संदीप शास्त्री चनघरे महाराज, गिरजीनाथ जाधव महाराज, हरिभाऊ दुबिले महाराज, विठ्ठल मुळे महाराज, भरतवल्ले महाराज, विलास वल्ले महाराज, गंगापूर वकील संघाचे अध्यक्ष अनिल इंगळे,ॲड.वाय. जाधव, ॲड.रविराज दारुंटे, ॲड. एस मनोरकर ॲड.एस लबडे ॲड.एम दारुंटे आदीसह संत महंत ह. भ .प .वारकरी संप्रदाय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीरामपूर जिल्हा व देवळाली तालुका जाहीर करण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राज्यातील प्रशासकीय सुलभता आणि विकासाचा वेग वाढविण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र श्रीरामपूर जिल्हा तसेच देवळाली-श्रीशिवाजीनगर तालुका घोषित करावा, अशी मागणी संघर्ष समिती आणि पसायदान प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस राहुरी फॅक्टरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आले असता, संघर्ष समिती व पसायदान प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र लांडगे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की, भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन करण्याचा प्रश्न मागील सुमारे पंचेचाळीस वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे शासनाने शासकीय निकषांनुसार आणि कमी खर्चात शक्य असलेल्या श्रीरामपूर जिल्ह्याची निर्मिती करावी. तसेच देवळाली-श्रीशिवाजीनगर या नवीन तालुक्याचीही घोषणा करावी. येत्या १ मे, कामगार दिनाच्या निमित्ताने हा निर्णय जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या वेळी कार्यकर्त्यांनी 'श्रीरामपूर जिल्हा झालाच पाहिजे' आणि 'देवळाली-श्रीशिवाजीनगर तालुका झालाच पाहिजे' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. भास्करराव कोळसे, दीपक पुरी, शामकांत खडके, चंद्रकांत कराळे, बाळासाहेब कदम, राजेंद्र साळवे, शरद साळवे, कांतीलाल उल्हारे, विश्वनाथ गागरे, शिवाजी शिंदे, अशोकराव जाधव, सुभाषराव शिंदे, समीर शेख, अमर देठे, विठ्ठल देवरे, रणजित अमोलिक, भिकन शेख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर वर्षानिमित्त नेवासा येथे विशेष मंत्रिमंडळ बैठक घेऊन हा ऐतिहासिक निर्णय जाहीर करावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

# निरंकारी मिशनच्या रक्तदान शिबिरात १०६ रक्तदात्यांचे रक्तदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर,** : ऋमानव- एकता' दिनानिमित्त श्रीरामपूर येथील संत निरंकारी सत्संग भवनात पार पडलेल्या रक्तदान शिबिरामध्ये १०६ रक्तदात्यांनी रक्तदान करत मानवाने मानवावर प्रेम करावे, एकमेकांचे आधार बनावे असा संदेश या माध्यमातून जगाला देण्यात आला.




या शिबिराचे उद्घाटन डॉ. दिलीप शिरसाठ (एम डी मेडिसिन) व सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांचे परम शिष्य केंद्रीय प्रचारक श्रीधरजी पाटील ठाणे-मुंबई यांचे हस्ते करण्यात आले.

२४ एप्रिल हा युगप्रवर्तक बाबा गुरुबचन सिंह जी महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज आणि निरंकारी राज पिताजी यांचे मार्गदर्शनाखाली देशभरात मानव एकता दिवस साजरा करण्यात येतो. ही परंपरा मागील चार दशकांपासून अखंडपणे सुरू असून श्रीरामपूर सह ९ हजार १७६ रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून १५ हजार २३० युनिट रक्त संकलित करण्यात आले आहे. श्रीरामपूर येथे झालेल्य शिबिरासाठी अहिल्यानगर येथील शासकीय रक्त संक्रमण केंद्राच्या डॉ सुमय्या खान व त्यांचे सहकाऱ्यांनी रक्त संकलित करण्याचे काम केले. शिबिर व सत्संग सोहळ्याचे नियोजन सेवा दल युनिट क्रमांक २५५ चे संचालक श्याम वधवा,सेवादल महिला इन्चार्ज रितिकाजी चावला व महिला सेवा दल ग्रुप इन्चार्ज राणीताई नाझिरे यांनी केले. याप्रसंगी गोविंद बोर्डे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलथे, पत्रकार राजेंद्र बोरसे, डॉ. शंकरराव मुठे, दिलीप गायके, विवेक माटा, बाळासाहेब शिंदे इत्यादी सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी या शिबिरास भेटी देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.

# संत विचार जगामध्ये शांतता प्रस्थापित करू शकतात. : हभप खोसे महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** :-संताचिये पायी हा माझा विश्वासश्र सर्व भावे दास झालो त्यांचाश्रश्र या अभंगावर बोलताना मनुष्य देह अज्ञानाची निवृत्ती व भगवत प्राप्ती करण्यासाठी प्राप्त झाला आहे ज्ञानाने अज्ञानाची निवृत्ती होते ते ज्ञान मनुष्य देहात मिळविता येते.याच मनुष्य लोकांमध्ये पुण्य केल्याने स्वर्ग प्राप्ती होते पाप केल्याने नरकात जातात जीवनात जसे कर्म करता तसे फळ मिळते.संत विचार जगामध्ये शांतता प्रस्थापित करू शकतात. असे प्रतिपादन हभप संदीप महाराज खोसे यांनी बोलताना व्यक्त केले.



मलकापूर ता शेवगाव येथे हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त सहाव्या दिवसांच्या किर्तनसेवेप्रसंगी गुरुवर्य हभप संदीप महाराज खोसे यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. या प्रसंगी महाराज उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना संत विचाराचे जीवनात आचरण प्रस्थापित करु शकतात हे महत्त्व अधोरेखित केले.

खोसे महाराज पुढे बोलताना म्हणाले की बम्हज्ञान म्हणजे काय तर गुरू देतात ते ज्ञान बम्हज्ञान. मनुष्य देहाचे स्वरूप नाशिवंत देह असुन दुःखाची निवृत्ती हे एक फल सांगितले. संत महात्म्यांनी प्रपंच सोडन्या ऐवजी परमार्थ प्रवृत्त करण्यास सांगितले . कर्माचे वर्म केवळ संतांनाच कळले . संत विचारावर विश्वास ठेवल्याने आपले जीवन सुखरूप होते तसेच सद्य परिस्थितीत युद्धकालीन परिस्थिती , ग्लोबल वार्मिंग यासारखे अनेक संकटे आपल्या जीवनात येत आहे पण संतांनी यातून कसे बाहेर पडायचे विश्वात्मक देव व त्याची पूजा म्हणजेच जे जे भेटे भुताश्र ते ते मानीजे भगवंता, वृक्षवल्ली वनचरे आम्हा सोयरेश्र यातून मनुष्य धर्म सांगितला व तो धर्मच या जगात शांतता निर्माण करू शकतो .यावेळी महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME AKSHAY NARAYN SARODE ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS AKSHAY NARAYAN SARODE Aspar 10 th Certificate DATE : 27/04/2026

# उन्हाळ्यात पचनसंस्थेची काळजी घ्या

## गॅस व ॲसिडिटीपासून बचावासाठी योग्य आहार महत्त्वाचा



उन्हाळा सुरू झाला की वाढत्या तापमानाचा परिणाम आपल्या संपूर्ण शरीरावर जाणवू लागतो. विशेषतः पचनसंस्था या ऋतूमध्ये अधिक संवेदनशील बनते. बाहेरील उष्णतेमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते, ज्याचा थेट परिणाम पचनक्रियेवर होतो.

परिणामी अनेकांना पोट फुगणे, गॅस, जळजळ आणि ॲसिडिटीसारख्या समस्या त्रास देऊ लागतात. उन्हाळ्यात शरीरातील उष्णता वाढल्यामुळे जठरातील आम्लांचे प्रमाण वाढते. यामुळे अन्न नीट पचत नाही आणि पोटात अस्वस्थता निर्माण होते.

त्यातच अनियमित खाण्यापिण्याच्या सवयी, जास्त तेलकट, मसालेदार किंवा तळलेले पदार्थ खाणे, बाहेरील फास्टफूडचे सेवन या गोष्टी समस्येला अधिक वाढवतात. तसेच, पुरेसे पाणी न पिणे हीदेखील एक मोठी चूक ठरते.

या समस्यांपासून बचाव करण्यासाठी आहारात हलक्या, पचायला सोप्या पदार्थांचा समावेश करणे आवश्यक आहे. भाजीपाला, फळे, दही, ताक, सॅलड यांसारखे पदार्थ पचनसंस्थेसाठी फायदेशीर ठरतात. विशेषतः काकडी, कलिंगड, खरबूज यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे शरीराला थंडावा देतात आणि पचन सुधारण्यास मदत करतात. दही आणि ताकामध्ये असलेले प्रोबायोटिक्स पोटातील चांगल्या जिवाणूंचे संतुलन राखतात.

दररोज पुरेशा प्रमाणात पाणी पिणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. दिवसभरात किमान ८ ते १० ग्लास पाणी प्यावे. तसेच नारळपाणी, लिंबूपाणी, सरबत यांसारख्या नैसर्गिक पेयांचा आहारात समावेश करावा. हे पेय शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढतात आणि उष्णतेपासून संरक्षण करतात.

उन्हाळ्यात एकदम जास्त खाण्याऐवजी थोड्या-थोड्या वेळाने हलके आहार घ्यावेत. जेवणानंतर लगेच झोपणे टाळावे आणि थोडे चालणे किंवा हलका व्यायाम करावा. यामुळे अन्न पचण्यास मदत होते. तसेच रात्री उशिरा जड अन्न सेवन टाळणे गरजेचे आहे.

गॅस व ॲसिडिटीचा त्रास टाळण्यासाठी चहा, कॉफी आणि शीतपेयांचे अति सेवन टाळावे. तंबाखू आणि मद्यपान यांसारख्या सवयी पचनसंस्थेला अधिक हानीकारक ठरतात, त्यामुळे त्यापासून दूर राहणे आवश्यक आहे.

एकूणच, उन्हाळ्यात योग्य आहार, पुरेसे पाणी आणि नियमित दिनचर्या पाळल्यास पचनसंस्थेचे आरोग्य चांगले राखता येते. लहान-सहान सवयींमध्ये बदल करून आपण गॅस, ॲसिडिटी आणि पोटाच्या इतर तक्रारींपासून सहज बचाव करू शकतो.

## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि .२८ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २७० ३७९ ९०० | ९-३ | १२० ४९० ४४८ | जोड ९७-१३-२६-८५-३० |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| २३८ ६७० ५८० | ३-६ | १५० २४० ६०० | जोड ३४-०६-१८-७५-६९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९ २४८ ६८ | ४-५ | १४० २३० ७८० | जोड ४६-१५-२०-८९-५७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 470 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द•ख•ल

### जि. प. बांधकाम उपअभियंता निलंबित करण्याची धनवडेंची मागणी

**शेवगाव** : जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपअभियंता व शाखा अभियंता यांची भ्रष्टाचार व गैरवर्तणुकीची सखोल चौकशी करून त्यांना निलंबित करण्याची मागणी शेवगाव तालुका वडार समाजाचे अध्यक्ष अशोक धनवडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव येथील सार्वजनिक बांधकाम उपअभियंता प्रभारी दत्तात्रय कर्डिले, शाखा अभियंता अभिमन्यू वावरे हे आपल्या पदाचा प्रचंड गैरवापर करीत आहेत. हे दोन्ही अधिकारी कंत्राटदारांकडून थेट पैशाची मागणी करतात. जोपर्यंत पैसे दिले जात नाही तोपर्यंत कंत्राटाची पिले मंजूर केली जात नाही. सर्वसामान्य नागरिक व लोकप्रतिनिधी कार्यालयात गेल्यास हे अधिकारी अत्यंत उद्धटपणे बोलतात. मी बाहेर आहे. अशी उत्तरे देऊन बेजबाबदारपणे सर्व सामान्य नागरिकांची हेळसांड करतात. या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमणात संपत्ती जमवली आहे. त्यांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.अशा भ्रष्ट आणि बेजबाबदार अधिकाऱ्यामुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असून तत्काळ या अधिकाऱ्यांची निलंबनाची कारवाई करण्यात यावी. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाची दखल घेतली गेली नाही तर जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा धनवडे यांनी दिला आहे.

### बेकायदेशीर जातपंचायतीत गायकवाड कुटुंबावर जीवघेणा हल्ला



**अहिल्यानगर** : राज्यात जातपंचायतींना कायद्याने बंदी असतानाही आष्टी तालुक्यातील कानडी बुद्रुक येथे बेकायदेशीर जातपंचायत भरवून गायकवाड कुटुंबावर बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असला तरी मुख्य आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गावातील दोन गटांमध्ये सुरू असलेल्या जमिनीच्या वादावर तोडगा काढण्यासाठी काही व्यक्तींनी जातपंचायत बोलावली होती. या पंचायतीत बाबुराव साहेबराव फुलमाळी, गंगाराम शंकर फुलमाळी, सरपंच गुलाब गोपाळा गायकवाड, महेश बोरा गायकवाड, माणिक साहेबा फुलमाळी, भीमा साहेबराव फुलमाळी आणि बाजीराव सठवा फुलमाळी यांचा सहभाग होता. मात्र, वाद सोडवण्याऐवजी पंचांनी परिस्थिती अधिक चिघळवली. काही पंचांनी दुसऱ्या गटाकडून पैसे घेऊन एका गटाला दुसऱ्यावर हल्ला करण्यास प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोपही समोर आला आहे. यानंतर वाद विकोपाला जाऊन गायकवाड कुटुंबातील यल्लाप्पा शिवराम गायकवाड, किरण गायकवाड आणि चंदा किरण गायकवाड यांच्यावर लोखंडी रॉडने डोक्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला.

### महाराष्ट्र दिनी 'नगर जल्लोष'चा भव्य सांस्कृतिक सोहळा

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र दिन निमित्त शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही 'नगर जल्लोष' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, मागील पंधरा वर्षांपासून सातत्याने हा कार्यक्रम जॉगिंग पार्क, प्रोफेसर कॉलनी येथे मोठ्या उत्साहात पार पडत आहे. यंदाही या कार्यक्रमाच्या भव्य रंगमंच उभारणीचा शुभारंभ नुकताच करण्यात आला असून, नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. हा बहुप्रतिक्षित कार्यक्रम शुक्रवार, १ मे रोजी सायंकाळी ६ वाजता प्रोफेसर कॉलनी चौकातील जॉगिंग पार्क येथे रंगणार आहे. कार्यक्रमात सिने अभिनेत्री व नृत्यांगना उर्मिला कानिटकर-कोठारे, इंडियन आयडॉल फेम गायक कैवल्य केजकर, सागर म्हात्रे, श्रावणी महाजन तसेच शाहीर रामानंद उगले यांच्या दमदार सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले जाणार आहे. या वर्षीच्या 'नगर जल्लोष'चे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्रात पहिल्यांदाच सादर होणारा छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक यांचा जिवंत देखावा. भव्य सेट, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रभावी सादरीकरणातून इतिहासाचा हा सोहळा प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी नगरकरांना मिळणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी पूर्णपणे मोफत असून, शहरातील विविध ठिकाणी पासेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये दिल्लीगेट येथील क्लासिक फोटो, आगरकर मळा येथील मयुरी मॉल, मार्केट यार्डमधील महावीर कलेक्शन, मारुती मंदिर समोर राम एजन्सी, प्रोफेसर कॉलनी चौकातील शिंगवी ज्वेलर्स तसेच झोपडी कॅन्टीन येथील प्रतिष्ठा एथनिक या ठिकाणांचा समावेश आहे.

### स्नेहमेळाव्यात 'माहेर' भेटीचा आनंद

**अहिल्यानगर** : येथील जानकीबाई आपटे बालिका आश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बालिकाश्रम रोड येथील मुलींच्या शाळेच्या १९६५ पासून आजपर्यंतच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या मैत्रिणी, शिक्षक आणि शाळेच्या आठवणींनी संपूर्ण परिसर अक्षरशः भारावून गेला.

या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे पाचशेहून अधिक माजी विद्यार्थिनी उपस्थित राहिल्या. पुणे, ठाणे, कल्याण, मुंबई, औरंगाबाद, नाशिक तसेच जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा शाळेच्या आवारात आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

---

शिवाजी महाराजांविषयी झालेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यांच्या निषेधार्थ

# संभाजी ब्रिगेड व समविचारी संघटनांकडून निषेध



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शिवरायांवर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने श्रीगोंद्यात जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला .शिवरायावर टीका, तर जनतेचा रोष ठोकाठोक या घोषणांनी श्रीगोंद्याचे रस्ते दणाणून गेले. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी झालेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यांच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेड व समविचारी संघटनांनी अनोख्या पद्धतीने तहसील कार्यालयावर तिरडी आंदोलन छेडत संताप व्यक्त केला.

शिवरायांचा सन्मान हा केवळ इतिहासाचा भाग नाही तो आजच्या समाजाचा स्वाभिमान आहे. आणि हा स्वाभिमान जपण्यासाठी श्रीगोंद्यातील जनतेने पुन्हा एकदा ठाम भूमिका घेतल्याचे या आंदोलनातून दिसून आले.नागपूर या ठिकाणी शिवरायांवर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने श्रीगोंद्यात जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला .शिवरायावर टीका, तर जनतेचा रोष ठोकाठोक या घोषणांनी श्रीगोंद्याचे रस्ते दणाणून गेले.धिरेंद्र शास्त्री आणि संजय गायकवाड यांच्या विरोधात हे आंदोलन उभारण्यात आले. शनी चौक ते तहसील कार्यालय असा तिरडी मोर्चा काढण्यात आला. तहसील कार्यालयाजवळ ती नेऊन 'विसावा' देण्यात आला. आणि त्यानंतर श्रद्धांजली अर्पण करून संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या.मोर्चादरम्यान घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. इतिहासाचा अवमान चालणार नाही आणि शिवरायांचा अपमान सहन करणार नाही अशा ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडल्या.

संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित वक्तव्यांचा समाचार घेत कठोर शब्दांत निषेध नोंदवला.नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात धिरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या वक्तव्यावरून तसेच 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या संदर्भात आमदार गायकवाड यांनी केलेल्या वादग्रस्त टिप्पणी आणि कथित धमकीच्या घटनेवरून संताप व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात बामसेफचे सुभाष बोराडे, सत्यशोधक भीमराव कोथिंबीर, आम आदमी पार्टीचे राजेंद्र नागवडे, संभाजी ब्रिगेडचे वैभव मिसाळ, बंडूतात्या जगताप, अभिषेक सावंत, अजिजभाई शेख, अरविंद कापसे, नाना शिंदे, गणेश पारे, दीपक मुखरे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व शिवप्रेमी सहभागी झाले होते.

---

# शिरसाठ हत्याकांडातील आरोपींना अटक करा

## ७० दिवस उलटूनही आरोपी मोकाट; मोक्का अंतर्गत कारवाईची मागणी




**अहिल्यानगर** : नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खुनातील आरोपींना तात्काळ अटक करावी व त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शिरसाठ कुटुंबीयांसह गावातील महिलांनी सोमवारी (दि. २७ एप्रिल) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण केले. या आंदोलनात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. या उपोषणात स्वाती नितीन शिरसाठ, शारदा शिरसाठ, स्वाती शिरसाठ, आशा आल्हाट, उषा शिरसाठ, वंदना शिरसाठ, तेरेसा शिरसाठ, वैशाली मगर, नंदा साळवे, शिवबा साळवे, रोहिणी गायकवाड, पल्लवी हिवाळे, सविता शिरसाठ यांसह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

यावेळी उपोषणकर्त्यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी घोडेश्वरी हॉस्पिटल, घोडेगाव (ता. नेवासा) येथे नितीन शिरसाठ यांची भरदिवसा गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला तब्बल ७० ते ८० दिवस उलटूनही आरोपी अद्याप मोकाट आहेत. मृत नितीन शिरसाठ यांच्या पत्नीने म्हटले आहे की, मी त्या घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित होते. आमची ३ महिन्यांची मुलगी आहे व आणखी पाच लहान मुले आहेत. आरोपी अजूनही मोकाट असल्याने आमच्या कुटुंबावर केव्हाही हल्ला होऊ शकतो. आम्हाला सतत भीतीच्या छायेत जगावे लागत आहे.आरोपींना कोणीतरी पाठीशी घालत असल्याचा संशय व्यक्त करत, पोलीस प्रशासनावर नेमका कोणाचा दबाव आहे? असा सवालही कुटुंबीयांनी उपस्थित केला.

सदर प्रकरणातील आरोपी हे 'फुलमाळी टोळी'शी संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. या टोळीवर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती असून, पोलीस प्रशासनाला याची पूर्ण कल्पना असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. तरीही त्यांच्यावर कठोर कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही टोळी संघटित पद्धतीने गुन्हे करत असल्याने त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई होणे गरजेचे आहे. केवळ आश्वासन देऊन वेळकाढूपणा करण्याऐवजी पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी उपोषणकर्त्या महिलांनी व्यक्त केली. नितीन शिरसाठ हत्याकांडातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शिरसाठ कुटुंबीय व महिलांनी दिला आहे.

---

# सेशन कोर्ट निकालाविरोधात काते कुटुंबाचे उपोषण



**अहिल्यानगर** : जिल्हा न्यायालयाच्या सेशन कोर्टाने दिलेल्या निकालाविरोधात अन्याय झाल्याचा आरोप करत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव काते यांनी आपल्या कुटुंबीयांसह जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषण सुरू केले. या आंदोलनात सुशिला काते, अनिता जाधव, रेखा भोगले, श्रद्धा काते, आराधना भोगले, अंकिता भोगले, राणी जाधव, सिताबाई रोकडे, सीमा काते, शंकर काते, संतोष उघडे यांच्यासह काते परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

काते यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले एमआहे की, ते सामाजिक कार्यकर्ते असून भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ता म्हणून काम करतात. त्यांच्या मुलगा राजू साहेबराव काते याच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात ११ नोव्हेंबर २०२१ रोजी एका महिलेने भारतीय दंड विधान कलम ३७६, ४५२, ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी या प्रकरणात तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

या प्रकरणात ६ वे जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी १२ मार्च २०२६ रोजी राजू काते यास दोषी ठरवत १० वर्षे सक्त मजुरी व दंडाची शिक्षा सुनावली. मात्र, हा निकाल वस्तुस्थितीचा योग्य विचार न करता देण्यात आल्याचा गंभीर आरोप काते यांनी केला आहे.

काते यांच्या मते, संबंधित महिलेने सुरुवातीला रुग्णालयात उपचारादरम्यान अनोळखी व्यक्तीने अत्याचार केला असे सांगितले होते, अशी नोंद वैद्यकीय कागदपत्रांत आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिने कथितरीत्या नाव बदलून राजू काते याच्यावर आरोप केला. यामुळे संपूर्ण प्रकरण संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी केला.

तसेच, या प्रकरणातील डीएनए तपासणी अहवाल कायद्यानुसार ९० दिवसांत मिळणे अपेक्षित असताना तो सुमारे १४ महिन्यांनी सादर करण्यात आला. विशेष म्हणजे, दोन्ही वेळच्या डीएनए अहवालात निष्कर्ष 'निगेटिव्ह' आले असतानाही न्यायालयाने त्याकडे दुर्लक्ष करून शिक्षा ठोठावली, असा आरोप काते यांनी केला आहे.

---

# पे-अँड-पार्क व नो-हॉकर झोन प्रस्तावास तीव्र विरोध

## सेनेचे नगरसेवक योगीराज गाडे यांचे आयुक्तांना निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेकडून शहरातील विविध भागात प्रस्तावित करण्यात आलेल्या पे-अँड-पार्क, नो-पार्किंग व नो-हॉकर झोन निर्णयाविरोधात शिवसेनेचे नगरसेवक योगीराज गाडे यांनी आज महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिले.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील सर्वसामान्य नागरिक, लहान व्यावसायिक, हातगाडीधारक व फेरीवाले यांच्यावर हा निर्णय अन्यायकारक ठरणार आहे. सध्या शहरातील अनेक मुख्य रस्ते खोदकामामुळे अडचणीत आहेत. वाहनसंख्या प्रचंड वाढलेली असताना पार्किंगसाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत पे-अँड-पार्कच्या माध्यमातून नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच प्रस्तावित नो-हॉकर झोनमुळे शेकडो कष्टकरी विक्रेत्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार आहे. पुनर्वसनाचा ठोस आराखडा नसताना थेट निर्बंध लादणे अमानुष असून त्यांच्या कुटुंबाचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होईल. या कष्टकरी लोकांना पर्यायी जागा किंवा रोजगार कोण देणार? असा सवालही नगरसेवक गाडे यांनी उपस्थित केला आहे.

महानगरपालिकेने प्रथम शहरातील पार्किंग क्षमतेचा अभ्यास अहवाल जाहीर करावा, बाधित विक्रेत्यांच्या पुनर्वसनाचा आराखडा स्पष्ट करावा व सर्व लोकप्रतिनिधी, व्यापारी संघटना व फेरीवाला संघटनांसोबत चर्चा करून निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महसूलवाढीच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांची लूट होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगरच्या सर्वसामान्य नागरिकांच्या व कष्टकरी घटकांच्या हितासाठी हा प्रस्ताव तात्काळ स्थगित करून पुनर्विचार करावा, अशी ठाम भूमिका नगरसेवक योगीराज गाडे यांनी घेतली आहे.

---

# आरोग्य केंद्र झोपडपट्टीतील नागरिकांसाठी आधार : उडाणशिवे




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी आणि जुनी झोपडपट्टी म्हणून ओळख असलेल्या रामवाडी परिसरात आरोग्य सुविधांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. येथे प्रमुख्याने कचरा वेचक, कष्टकरी कामगार व रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून, या नागरिकांसाठी आरोग्य सेवा पूर्वी मोठे आव्हान होते. मात्र त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेचे निमंत्रक विकास उडाणशिवे यांनी केले.

महानगरपालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्रात समता फाउंडेशनच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना उडाणशिवे म्हणाले , महानगरपालिकेच्या वतीने रामवाडी येथे उभारण्यात आलेले आरोग्य केंद्र आज अनेक गरजूंसाठी जीवनदान देण्याचे कार्य करत आहे. या केंद्रामध्ये सामान्य तपासणी, औषधोपचार, लसीकरण तसेच विविध आरोग्य सुविधा उपलब्ध होत असल्याने परिसरातील नागरिकांचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या शिबिरामध्ये डॉ. अभिषेक शिंदे व डॉ. आनंद बोजा यांनी ४० कचरा वेचक कामगारांची नेत्र तपासणी केली. त्यापैकी १५ कचरा वेचक कामगारांची मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे. या उपक्रमासाठी रामवाडी आरोग्य केंद्राच्या स्टाफ नर्स रोहिणी बोरुडे तसेच सहसेविका नीता उडानशिवे आणि देविदास पोंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या विशेष सहकार्यामुळे रामवाडी येथे हे आरोग्य केंद्र उभारण्यात आले.

आज कचरा वेचक तसेच अन्य कामगारांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हे आयुक्त डांगे यांच्या संवेदनशील निर्णयामुळेच शक्य झाले. शहराच्या इतर भागातील आरोग्य केंद्रात १० रुपये घेतले जातात, परंतु रामवाडी केंद्रावर विनामूल्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याने आयुक्तांचे आभार मानण्यात आले.


कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने या सामाजिक व आरोग्यदायी उपक्रमाचे स्वागत करण्यात आले असून, समाजातील कष्टकरी व वंचित घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

---

# पिंपळगाव पिसा रेणुका माता यात्रेची लगबग

## पंजाबराव डख यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : तालुक्यातील पिंपळगाव पिसा येथे ग्रामदैवत श्री रेणुका माता यात्रा उत्सव रविवारी, ३ मे रोजी भक्तिभाव आणि जल्लोषात साजरा होणार असून धार्मिकतेसोबतच ज्ञानाचा संगम घडवणारा हा उत्सव ठरणार आहे. भक्तीही आणि प्रगतीहीअसा संतुलित संदेश या यात्रेतून दिला जाणार आहे.

सध्या यात्रांचा हंगाम चालू आहे यात्रा म्हणजे फक्त जत्रा नाही; ती परंपरेचा मान, ज्ञानाचा प्रकाश आणि समाजाला जोडणारा धागा आहेपिंपळगाव पिसा यंदा हे समीकरण अगदी नीट जमवतंय! असेच पाहण्यास मिळत आहे दि ३ मे रोजी रेणुका माता यात्रेनिमित्त सायंकाळी ४ ते ६ या वेळेत प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पीक नियोजन, जोखीम व्यवस्थापन आणि आधुनिक शेती तंत्रज्ञान यावर ते मार्गदर्शन करणार आहेत. शिवाय, परिसरातील प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला दाद दिली जाणार आहे कष्टकऱ्यांच्या घामाला मानाचा मुजरा, असं म्हणायला हरकत नाही!यानंतर सायंकाळी ६ ते ८ या वेळेत राष्ट्रीय कीर्तनकार व शिवचरित्रकार कबीर महाराज अत्तार यांचे प्रभावी कीर्तन रंगणार आहे. त्यांच्या ओजस्वी वाणीमधून शिवचरित्र आणि अध्यात्म यांचा संगम अनुभवायला मिळणार असून, उपस्थितांना प्रेरणेचा नवा ऊर्जास्रोत मिळेल. हा उत्सव सदविचार मंच, पिंपळगाव पिसा यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून कार्यक्रमाचे स्थळ पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय येथे निश्चित करण्यात आले आहे.तालुक्यातील व पंचक्रोशीतील शेतकरी, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. उद्योजक संदीप पंधरकर यांच्या सहकार्याने होणाऱ्या या उपक्रमाबाबत आयोजकांनी आपली उपस्थितीच आमची खरी प्रेरणा!हि एकच ओळ ठामपणे सांगितली आहे

---

छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या

# धीरेंद्र शास्त्रींचा शहर काँग्रेसकडून तीव्र निषेध

## शास्त्रींवर गुन्हा दाखल करून महाराष्ट्र बंदीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : धिरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी नागपूर येथे झालेल्या एका कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दल इतिहासाची मोडतोड करून अत्यंत चुकीचे व अवमानकारक वक्तव्य केले आहे. या विधानाचा निषेध करण्यासाठी अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन कडक कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस शिष्टमंडळाने पोलीस उप अधीक्षक दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन त्यांना हे निवेदन दिले . यावेळी त्यांच्या समवेत फिरोज शेख, सुभाष रानदिवे , संतोष कांबळे, अभिजीत कांबळे, गणेश भोसले, सुनील क्षेत्रे , फैय्याज शेख, राजेंद्र कर्डिले उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, धिरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या. हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभार चालवण्याबाबत समर्थ रामदास स्वामी यांना केलेली विनंती आणि त्यावर स्वामिनी दिलेले उत्तर हे कपल कल्पित संघीय वर्णवादी मानसिकेतून बोल घेवड्या धीरेंद्र शास्त्री याच्या तोंडी आले असावे कारण ज्यावेळी हे अपमानास्पद वक्तव्य केले गेले,

ज्या कार्यक्रमात हा प्रकार घडला, तिथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि रा. स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत उपस्थित होते.

आपल्या दैवताचा अपमान होत असताना या नेत्यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली आणि कोणताही विरोध दर्शवला नाही, ही शरमेची बाब असल्याची टीका दीप चव्हाण यांनी केली आहे.

त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या धिरेंद्र शास्त्रींवर तातडीने गुन्हा दाखल करावा. व अशा वादग्रस्त व्यक्तीला महाराष्ट्रात येण्यास कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी.

येत्या दोन दिवसांत जिल्हाभरात तीव्र निदर्शने करून या प्रवृत्तीचा निषेध करण्यात येईल.

यावेळी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, सेवादल आणि एन.एस.यु.आयचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनाने यावर त्वरित कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# सावरगाव घुले बेलसोंडा वस्तीचा पाणीप्रश्न मार्गी

## महिलांकडून जयश्रीताई थोरात यांचे आभार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर (प्रतिनिधी) :** तालुक्यातील सावरगाव घुले येथील बेलसोंडा वस्तीचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नांमुळे आणि युवक नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे या योजनेला गती मिळाली असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पठार भागातील या वस्तीमध्ये दीर्घकाळापासून तीव्र पाणीटंचाई जाणवत होती. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना लांब अंतरावरून डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत होते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी ग्रामपंचायतीकडे काही निधी उपलब्ध असला, तरी उर्वरित निधीसाठी लोकसहभागाची गरज होती.




या पार्श्वभूमीवर वस्तीतील महिलांनी पुढाकार घेत डॉ. जयश्रीताई थोरात यांची भेट घेऊन पाणीप्रश्न सोडवण्याची भावनिक मागणी केली. महिलांच्या या निवेदनाची दखल घेत जयश्रीताईंनी तात्काळ प्रतिसाद देत पाईपलाईन कामासाठी आवश्यक मदत उपलब्ध करून दिली. त्यांच्या या निर्णयामुळे रखडलेली योजना मार्गी लागण्यास मोठी मदत झाली आहे.

लवकरच सावरगाव घुले ग्रामपंचायतीमार्फत पाईपलाईनचे काम सुरू होणार असून बेलसोंडा वस्तीतील प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे महिलांची पाणी भरण्याची कष्टप्रद धावपळ लवकरच थांबणार असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

माजी सरपंच बाबाजी दगडू घुले यांनी सांगितले की, महिलांच्या डोक्यावरील हंडा आता कायमचा उतरणार असून हा आमच्यासाठी मोठा दिलासा आहे. विशेष म्हणजे १९७२ पासून सुरू असलेली टँकर व्यवस्था आता बंद होण्याच्या मार्गावर असून ही बाब ऐतिहासिक ठरणार आहे.

या उपक्रमासाठी ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांचे कौतुक होत आहे. यावेळी बोटा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य अजय फटांगरे, तसेच रंजना घुले, अर्चना घुले, विद्या घुले, अलका घुले, शोभा घुले, चारुशीला घुले, जयश्री घुले, भिंबाई घुले, जनाबाई घुले, लता घुले, निर्मला घुले, वत्सला घुले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी डॉ. जयश्रीताई थोरात यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

**संगमनेर तालुका 'परिवार' म्हणून विकासाचा ध्यास**

संगमनेर तालुका हा परिवार मानून सर्वसमावेशक विकास साधण्याचा प्रयत्न बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने केला आहे. भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन विकासकामे राबवली जात असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजही पठार भागातील काही गावे व वाड्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. हीच परंपरा पुढे चालू ठेवण्याचा निर्धार डॉ. जयश्रीताई थोरात यांनी व्यक्त केला आहे.

---

# द • ख • ल

## अवसरी बुद्रुक येथे २० दिवसीय उद्योजकता प्रशिक्षण

**अवसरी बुद्रुक :** ग्रामीण भागातील महिलांना उद्योगक्षम बनवून त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अवसरी बुद्रुक येथे फळे व भाज्यांच्या निर्जलीकरण प्रक्रियेवरील २० दिवसीय सूक्ष्म कौशल्य उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. भारतीय उद्यमिता विकास संस्थान आणि अकँचर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.या प्रशिक्षणासाठी ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे अंतर्गत जिज्ञासा लोकसंचलित साधन केंद्र, मंचर यांचे सहकार्य लाभले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ५२ महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये उद्योगाविषयी आत्मविश्वास निर्माण होऊन स्वतःचा व्यवसाय उभारण्याची प्रेरणा मिळाली आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच सारिकाताई रत्नाकर हिंगे, पोलीस पाटील माधुरीताई जाधव, माजी उपसरपंच अनिल हिंगे, ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे स्थानिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा जारकड यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे यांनी केले.

## गोमातेला राष्ट्रीय प्राणी घोषित करा कत्तल थांबविण्यासाठी निवेदन

**राहुरी :** गोमातेला राष्ट्रीय प्राणी घोषित करा तसेच गोमातेचे होणारी कत्तल थांबवावी याकरिता राहुरी तहसील कार्यालयात आज निवेदन देण्यात आले. या दरम्यान प्रकाश शेठ पारख, ललित चोरडिया, डॉ. जयंत कुलकर्णी,मधुकर घाडगे,ओंकार देशपांडे,रवींद्र थोरात, बंटी पटारे,योगेश सोलंकी,गौरव तनपुरे,साळवे संतोष उंडे,भारत मुसमाडे, आबा नाईकवाडे,पारस राका, श्याम भाऊ गोसावी,रवींद्र बलमे अनेक कार्यकर्ते तेथे हजर होते. भारतात मोठ्या प्रमाणावर मांस निर्यात केली जाते, केंद्र सरकारने मांस निर्यात करणाऱ्या मोठ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी,त्यांच्यावर निर्बंध आणावेत यासाठी केंद्र सरकारने पावले उचलली पाहिजे असे प्रतिपादन केले. शेतकऱ्यांनी गोवंश कसायांकडे न विकता त्याची पालन पोषण करावे कत्तलखान्यात जाऊ देऊ नये असे आवाहन शेतकऱ्यांना केले. अशाच प्रकारचे निवेदन संपूर्ण भारतभरातून गोप्रेमींकडून प्रशासनाला देण्यात आले आहे काही महिन्यांनी यावर जर कारवाई झाली नाही तर आंदोलन छेडणार असल्याची माहिती ललित चोरडिया यांनी दिली. ह.भ.प. अर्जुन महाराज तनपुरे यांनी नायब तहसीलदार साहेबांकडे सह्या केलेले निवेदन दिले.



## पोंदेवाडीत फेरीवाल्यांना बंदी

**लोणी धामणी :** पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी संयुक्तपणे महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गावातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने दिनांक २६ जानेवारी २०२६ पासून गावाच्या हद्दीत बाहेरील फिरत्या फेरीवाल्यांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. या निर्णयानुसार भाजीपाला, फळे, कपडे, प्लास्टिक वस्तू, भंगार इत्यादी वस्तू विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांना गावात येण्यास मनाई करण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करून कोणी फेरीवाला गावात आढळल्यास त्याचा माल जप्त करण्यात येईल, तसेच ५०० रुपये दंड आकारण्यात येईल आणि आवश्यक ती पोलीस कारवाई केली जाईल. ग्रामपंचायत पोंदेवाडी व ग्रामस्थांनी गावातील नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी बाहेरील अनोळखी फेरीवाल्यांकडून कोणतीही खरेदी करू नये. पोंदेवाडी परिसरात अलीकडे लहान-मोठ्या चोरीच्या घटना वाढल्या असून त्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या चोरीच्या घटनांना आळा बसावा आणि नागरिकांमधील भीती दूर व्हावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे माजी सरपंच अनिल वाळुंज यांनी सांगितले.

## 'ज्ञानोबा-तुकाराम' गजरात जर्मनी दुमदुमले; विठ्ठलधामात ऐतिहासिक सोहळा

**पुरंदर :** जर्मनीतील किर्चहेम येथे 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात श्री विठ्ठलधाम मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा रविवारी (दि. १९) अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. हा सोहळा संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी आणि श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. भारतातून सुमारे ३५ वारकरी या सोहळ्यासाठी सहभागी झाले होते. तसेच जर्मनीतील मराठी व जर्मन भाविकांसह विठ्ठलधाम भक्ती मार्गाचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमाची सुरुवात शनिवारी (दि. १८) सकाळी काकड आरतीने झाली. दुपारी ३ वाजता भव्य दिंडी काढण्यात आली. सायंकाळी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर आधारित 'नमो ज्ञानेश्वरा' हा इंग्रजी कार्यक्रम सादर करण्यात आला. रविवारी सकाळी ७.३० वाजल्यापासून प्राणप्रतिष्ठा विधींना प्रारंभ झाला. नामघोष आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. यावेळी ह.भ.प. डॉ. भावार्थ देखणे यांनी इंग्रजीतून कीर्तन-निरूपण करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण आळंदी संस्थानच्या अधिकृत फेसबुक पेजवर करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. भावार्थ देखणे, नितीन महाराज मोरे, सुनील महाराज मोरे, श्रीकांत पाटील, विठ्ठलधाम मंदिराचे ऋषी आत्मानंद, स्वामी आकाश आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# निपाणी वडगाव परिसरात शुद्ध पाणी पुरवठा करावा, निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर, :** निपाणी वडगाव परिसरातील दौंड वस्ती येथे पिण्याच्या पाण्याचे गंभीर प्रदूषण झाले असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे निवेदन देत तात्काळ शुद्ध पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

दूषित पाण्यामुळे संपूर्ण परिसरातील पिण्याचे पाणी वापरण्यायोग्य राहिलेले नाही. परिणामी लहान मुले, वयोवृद्ध तसेच पशुधन यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः किडनी व पचनसंस्थेशी संबंधित आजारांची लक्षणे वाढताना दिसत असल्याने परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. स्थानिकांच्या मते, ग्रामपंचायतीला



या समस्येची पूर्ण कल्पना असूनही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा करणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत जबाबदारी असताना, या अत्यावश्यक प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तातडीने स्वच्छ पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, तसेच आवश्यक असल्यास फिल्टरयुक्त पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. याशिवाय परिसरातील विहिरी व कुपनलिकांमधील पाणी दूषित होण्यामागील कारणांचा शोध घेऊन त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची गरज अधिक तीव्र झाली असून, परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन त्वरित कारवाई करावी, अन्यथा नागरिकांना उच्च पातळीवर तक्रार करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी विठ्ठल जगन्नाथ सोनवणे, संजय राऊत आदी उपस्थित होते. या निवेदनावर बाळासाहेब शिंदे, शरद तुपे, नितीन शेळके, तैय्यब सय्यद, उत्तम तुपे, संतोष आव्हाळे, हसनभाई शेख, अरिफ शेख, खाजा शेख, आयुब पठाण, अलिम शेख, बाळासाहेब दौंड, समशेर शेख, सोमनाथ राठोड, केशव तुपे आदींची नावे आहेत

# रांजणखोल येथील अखंड हरिनाम सप्ताहाची आज सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राहाता तालुक्यातील रांजणखोल (गांधीवाडी) येथे ब्रह्मलीन नारायणगिरीजी महाराज, गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज, कै काशिनाथ बाबा यांच्या कृपेने व बालयोगी ऋषिकेश महाराज यांच्या अधिपत्याखाली अखंड हरिनाम सप्ताह व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संगीतगाथा पारायण सोहळा व संत तुकाराम महाराज चरित्र कथेस मंगळवार दिनांक २१ एप्रिल रोजी प्रारंभ झाला आहे ते मंगळवार दि.२८ एप्रिल रोजी काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.

या सप्ताहाचे व्यासपीठ चालक विशाल महाराज गिरमे आहेत या सप्ताहाचे दररोज दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७:३० ते ११:३० संत तुकाराम महाराज गाथा पारायण , सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० संत तुकाराम महाराज चरित्र कथा आज मंगळवार दि.२८ रोजी सकाळी ०९ वाजता आचार्य डॉ शुभम महाराज कांडेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्तशृंगी सेवा मंडळ गांधीवाडी व रांजणखोल ग्रामस्थांनी केले आहे.

---

## श्रीरामपुरात गावरान कांद्याची ६७६४ गोणी आवक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत गावरान कांद्याला ११०० रुपये बाजारभाव जाहीर झाला असून काल गावरान कांदा ६७६४ गोण्यांची आवक झाली आहे, आवक स्थिर असून भावही स्थिरच आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत काल ६७६४ गोण्यांची आवक झाली असून कांदा नंबर एक - ९५० ते ११०० , कांदा नंबर दोन - ६५० ते ९००, कांदा नंबर तीन - ५०० ते ६००, गोल्टी - ४०० ते ८००, खाद - २०० ते ४५० असे भाव जाहीर झाले असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

# वाहतुक नियंत्रण करत असताना वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की, दोघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर, :** शहरातील शिवाजी रोडवर वाहतुक नियंत्रण करत असतांना एकाने मध्येच येऊन नो पार्किंग झोनमधील गाड्यावर कार्यवाही करण्यापूर्वी अनाउंसमेट करावी लागते असे म्हणून त्याने पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड यांच्या तोंडावरील मास्क ओढून त्यांचे ड्रेसवरील नेम प्लेट ओढून त्यांना धक्काबुक्की करुन त्यांचेशी अर्वाच्य भाषेत बोलून सरकारी कामात अडथळा निर्माण केला याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात

श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशनचे वाहतुक शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन शिवाजी गायकवाड व त्यांचे सोबत पोलीस कॉन्स्टेबल अनिल शरद लांडे हे दोघे दि २५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास वरीष्ठांच्या आदेशानुसार श्रीरामपुर शहरातील वार्ड नं.०३ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गिरमे चौक जाणारे रोडवरील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनावर शासकीय नियमाप्रमाणे सरकारी गणवेशामध्ये दंडात्मक कार्यवाही करत असताना, स्वदेशी चहाचे दुकानासमार एका अनोळखी इसमाने त्याचा मोबाईलचे कॅमेरा व्हिडीओ चालु करुन पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड व त्याचे सहकारी पोलीस कॉन्स्टेबल लांडे हे सरकारी गणवेशामध्ये असतांना त्यांचे ड्रेसवरील नेम प्लेट ओढून त्यांना धक्काबुक्की करुन तुम्ही कोणाच्या आदेशाने कार्यवाही करत आहेत, तुम्हाला माहिती आहे काय ? नो पार्किंग झोनमधील गाड्यावर कार्यवाही करण्यापूर्वी अनाउंसमेट करावी लागते असे म्हणून त्याने पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड यांच्या तोंडावरील मास्क ओढून त्यांचेशी अर्वाच्य भाषेत बोलून सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. त्या अज्ञात इसमांने व्हिडीओ काढणे बंद करुन वाहतुक शाखेचे अंमलदार यांना धमकी दिली की, हा मी केलेला व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारीत करुन तुमची बदनामीच करतो परत येथुन पुढे तुमची कोणावर कार्यवाही करण्याची हिम्मत नाही झाली पाहिजे असे म्हणत इन्स्टाग्राम या सोशल मिडीया ॲपवर ॲरर्हीश्र.श्रीझ्ज्ञरव. ९२ वा आयडी वरुन त्या अनोळखी इसमाने त्याचे मोबाईलमध्ये काढलेला व्हिडिओ जनमाणसांमध्ये पोलीसांबद्दल असंतोष निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रसारित केला आहे. तरी सदरचा व्हिडीओ इंस्टाग्राम या सोशल मिडीयावर प्रसारीत केलेल्या आयडीधारकाचे नाव राहुल अशोक लुक्कड रा.कांदा मार्केट, वार्ड नं.०६, श्रीरामपुर असे असल्याचे पोलीसांना समजले असून, वाहतूक शाखेचे अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन गायकवाड यांनी व्हिडीओ काढणारा तो अनोळखी इसम व इंस्टाग्राम या सोशल मिडीया ॲपवर व्हिडीओ प्रमोशन करणारा -राहुल अशोक लुक्कड रा.कांदा मार्केट वार्ड नं.०६. श्रीरामपूर या दोघांनी संगनमताने गुन्हा केला आहे.

---

# आर.जे.एस. फार्मसी महाविद्यालयात राज्यस्तरीय परिषद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग च्या झपाट्याने बदलणाऱ्या नवीन युगामध्ये नवीन तंत्रज्ञान शिकून संशोधनाची दिशा कशी ठरवावी व ते तंत्रज्ञान कसे अमलात आणावे या दृष्टीने आयोजलेली आर. जे. एस .कॉलेज ऑफ फार्मसी ची राज्यस्तरीय परिषद विद्यार्थ्यांना नवीन दिशा व नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देणारा ठरला. औषधनिर्मिती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन वापरायचे भविष्य तज्ञांनी यांनी उलगडले 'फ्रॉम मॉलिक्यूल टू मेडिसिन ड्रग डिस्कव्हरी, डिजाईन अँड फोर्मुलेशन' विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद उत्साहात पार पडला.

आजच्या युगात औषध शोध प्रक्रिया केवळ प्रयोगशाळेत मर्यादित नसून ती संगणकीय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक अचूक व वेगवान होत आहे. अशा प्रकारचे राज्यस्तरीय परिषद हे ज्ञानवृद्धीबरोबरच विद्यार्थ्यांच्या करिअरला




दिशा देणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.असे महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष चांगदेव कातकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

या राज्यस्तरीय परिषदमुळे विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती क्षेत्रातील नव्या संधी व संशोधनाच्या दिशांबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली असून,त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीस मोठा फायदा होणार आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.नितीन जैन यांनी केले.पहिल्या सत्रात प्रा.डॉ.संतोष एस. छाजेड यांनी 'कॉम्प्युटर ऐडेड ड्रग डिझाईन' या विषयावर मार्गदर्शन करत औषध शोध प्रक्रियेत संगणकीय तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी मॉलिक्युलर मॉडेलिंग, डॉकिंग स्टडीज तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या मदतीने औषध संशोधन अधिक जलद, अचूक आणि किफायतशीर होत असल्याचे सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ.सचिन एस. गायकवाड यांनी 'ड्रग फॉर्म्युलेशन स्ट्रॅटेजीज' या विषयावर माहिती देताना ॲक्टिव्ह मॉलिक्यूलपासून प्रभावी डोसेज फॉर्म तयार करण्याच्या विविध टप्प्यांवर प्रकाश टाकला.औषधाची जैव उपलब्धता,स्थिरता आणि रुग्णांसाठी सुलभता यांचा विचार करून आधुनिक फॉर्म्युलेशन तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो, हे त्यांनी स्पष्ट केले.परिषदमध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. औषध शोध,डिझाइन,फॉर्म्युलेशन, तसेच नॉवेल ड्रग डिलिव्हरी सिस्टीम यासंबंधी विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी नोंदणी व स्वागत समारंभाने झाली.प्रमुख पाहुण्यांची ओळख महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. उषा जैन यांनी करून दिली.यामध्ये महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष चांगदेव कातकडे,सचिव प्रसाद कातकडे, सल्लागार विजय कडू,संचालक प्रणित कातकडे तसेच सल्लागार दीपक कोटमे उपस्थित होते.

या राज्यस्तरीय परिषदमुळे समन्वयक म्हणून प्रा.कावडे दादासाहेब यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.तर सूत्रसंचालन यांनी केले प्रा.आंबेकर रुचिका यांनी केले.

---

# जुन्नर तालुक्यात उष्माघाताचा पहिला बळी;

## निमगाव सावा येथे महिलेचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जुन्नर :** तालुक्यात उष्माघातामुळे पहिला मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. निमगाव सावा येथील सौ. रुपाली भाऊ गाडगे यांचे आज दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:४५ वाजता निधन झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, त्या शेतात खुरपणीचे काम करत असताना अचानक त्यांना उष्माघाताचा (क्शरीं डींअेंज्ञश) त्रास झाला. प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्याआधीच त्यांची प्राणज्योत मालवली.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**नागरिकांसाठी महत्त्वाची सूचना :**

सध्या उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत असून उष्माघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांनी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी :
दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो कष्टाची कामे टाळावीत.
बाहेर पडताना पुरेसे पाणी सोबत ठेवावे व वारंवार पाणी प्यावे.
डोक्याचे संरक्षण करण्यासाठी टोपी, रुमाल किंवा कापडाचा वापर करावा.
गरज नसल्यास उन्हात बाहेर पडणे टाळावे.
प्रशासनाकडूनही नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# खंडाळे येथे ४८ लाखांच्या सभामंडपाचे लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**रांजणगाव गणपती:** शिरुर तालुक्यातील खंडाळे येथे सुमारे ४८ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपाचे लोकार्पण उत्साहात पार पडले. या प्रसंगी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी खंडाळे गावातील महिला अस्मिता भवन व दोन खोल्यांच्या बांधकामासाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची घोषणा केली. तसेच गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढेही भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमात बोलताना वळसे पाटील यांनी समाजाने चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहावे, जीवनात प्रामाणिकपणा व चांगुलपणा जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. ग्रामविकासाच्या दृष्टीने मूलभूत सुविधांवर भर देण्याची गरज अधोरेखित करत, खंडाळे येथील नळपाणीपुरवठा योजना लवकरात लवकर



पूर्णत्वास नेण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या लोकार्पण सोहळ्यास शिरुर बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, दत्तात्रय कदम, विश्वास कोहकडे, प्रविण ढोकले, शुभांगी पडवळ, सनी थिटे, प्रा. माणिक खेडकर, महेश फंड, दशरथ फंड, गहिनीनाथ नरवडे, मारुती नरवडे, संतोष महाराज खेडकर, योगेश कर्डीले, सोपान नरवडे, विठ्ठल नळकांडे, नेहा महाराज भोसले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभामंडपासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल वळसे पाटील तसेच गहिनीनाथ नरवडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी रमेश नरवडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अहिल्यानगर जिल्हा बनतोय कबड्डीची पंढरी!

## गजानन किर्तीकर यांच्याकडून गौरव : जिल्हा कबड्डी संघटनेकडून कबड्डीपटूचा सन्मान




### ■ नगरचे खेळाडू भारतीय कबड्डी संघात

यावेळी संघटनेचे सचिव प्रा. गाडे म्हणाले की, जिल्हयात गुणवत्तेनुसार संघाची निवड प्रक्रिया होते. यामुळे नगरचा संघ राज्यात सलग पाच वेळा अंतिम सामन्यापर्यंत गेला. नगरचे तीन खेळाडू भारतीय संघात दिसतील. क्रिडा ॲकडमीसाठी महापालिकेकडे पाठपुरावा सुरू असल्याचे प्रा. गाडे म्हणाले.

### ■ नगरमध्ये इनडोअर कबड्डीचे मैदान

यावेळी क्रिडाअधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे म्हणाले की, वाडिया पार्क येथे ५२ कोटी रूपयांचा क्रिडा आराखडा तयार झाला असुन त्यातील १५ कोटी रूपये उपलब्ध झाले आहेत. यातुन कबड्डीचे अत्याधुनिक इन डोर मैदान तयार होणार आहे.

**तालुका प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** गेल्या पाच वर्षांमध्ये अहिल्यानगर जिल्हा कबड्डी संघाने राज्यात अव्वल स्थान प्राप्त केले असुन येथील खेळाडू आता राष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत. हा जिल्हा आता कबड्डी खेळाची पंढरी बनला आहे असे गौरवोदगार माजी खासदार व महाराष्ट्र कबड्डी संघटनेचे प्रभारी अध्यक्ष गजानन किर्तीकर यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा कबड्डी संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील पुरूष गट , कुमार गट व कुमारी गटातील कबड्डी संघाचा गौरव सोहळा शहरातील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात रविवारी आयोजीत करण्यात आला होता.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून किर्तीकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष व माजी आमदार दादा कळमकर होते.

यावेळी राज्य संघटनेचे खजिनदार मंगल पांडे, समालोचक राणा प्रताप तिवारी, क्रिडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, संपतराव भोसले, सचिन भोसले तसेच जिल्हा संघटनेचे सचिव प्रा. शशिकांत गाडे, विजयसिंह मिस्कीन, गोविंद भुजबळ, मुकेश मुळे, पोपट कडुस, प्रकाश बोरूडे, सुभाष तनपुरे, संजय फडके, अजय पवार , शंतनु पांडव, कैलास पठारे, निर्मलचंद्र थोरात, सुधाकर सुंबे आदि पदाधिकारी उपस्थीत होते.

राज्यपातळीवरील कबड्डी स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा कबड्डी संघाने घवघवीत यश मिळवले. या संघातील सहभागी खेळाडू व प्रशिक्षकांचा स्मृतिचिन्ह व ट्रॅकशुट देऊन गौरव करण्यात आला. यावेळी किर्तीकर म्हणाले की, कबड्डीला नावारूपास नेण्याचे काम नगर जिल्ह्याने केले. नगर जिल्हयातील उद्योजकांनी येथील कबड्डी खेळाला आर्थिक पाठबळ देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कबड्डी खेळाला अजूनही राजाश्रय मिळत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

---

## द•ख•ल

### जुन्या वादातून बाप-लेकास मारहाण

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर येथील डोंगरगण परिसरातील गड मांजरसुंबा फाटा येथे एका हॉटेलसमोर जुन्या वादातून बाप-लेकास बेदम मारहाण केल्याची घटना २५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नामदेव आनंदा मते (वय ७४, रा. मते वस्ती, डोंगरगण, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि त्यांचा मुलगा पांडुरंग हे नेवासा येथून काम संपवून दुचाकीवरून घरी परतत होते. वांबोरी रस्त्यावरील आबासाहेब पठारे यांच्या दुकानासमोर ते थांबले असताना, आरोपी अमोल बाळासाहेब मते आणि महेश बापू मते हे त्या ठिकाणी आले. यावेळी आरोपींनी तुला लई माज आला आहे, आज तुझा खेळच खल्लास करतो असे म्हणत फिर्यादींना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. मुलाने शिवीगाळीचा जाब विचारला असता, दोन्ही आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी अमोल मते याने हातातील लोखंडी गजाने पांडुरंग याच्या उजव्या हाताच्या मनगटावर जोरात प्रहार केला, तर महेश मते याने लाकडी दांडक्याने पाठीत मारहाण करून गंभीर दुखापत केली. दरम्यान, पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार दिवटे करत आहेत.

### दुकान खाली करण्यासाठी मालकासह भाडेकरूंना धमकावले

**अहिल्यानगर :** सावेडी नाका परिसरातील इंडियन बँकेजवळ असलेल्या भाड्याच्या दुकानाच्या वादातून एका व्यक्तीसह त्याच्या भाडेकरूंना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात एका ओळखीच्या व्यक्तीसह इतर तीन अनोळखी इसमांविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी आरोपी आकाश सोनवणे व त्याच्या तीन साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३५२ आणि ३५१ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक पुनम श्रीवास्तव करत आहेत.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी सय्यद इरफान अजिमोद्दीन जहागीरदार (वय ५२, रा. बाराइमाम कोठला) हे घरी असताना त्यांना मोबाईल फोनवर संपर्क करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. तसेच आरोपी आकाश सोनवणे याने इतर तीन साथीदारांसह फिर्यादीच्या सावेडी नाका येथील मालकीच्या दुकानात जाऊन तेथील भाडेकरूंना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. 'हे दुकान तातडीने रिकामे करा, अन्यथा जीवे मारू' अशी धमकी आरोपींनी भाडेकरूंना दिली.

### मंगळसूत्र लांबविले

**अहिल्यानगर** :छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील सुर्यानगर परिसरात भरदुपारी एका सेवानिवृत्त महिलेच्या गळ्यातील सुमारे १६ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. विठ्ठल-रूक्मिणी मंदिराजवळ २५ एप्रिल रोजी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास ही चोरी झाली असून, याप्रकरणी दोघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उर्मिला भास्कर वडवकर (वय ५८, रा. चैतन्य निवास, सुर्यानगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आपल्या दुचाकीवरून घरी जात होत्या. दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडवले. तोंडाला मास्क आणि डोक्यावर हेल्मेट घातलेल्या या चोरट्यांनी पत्ता विचारण्याचा बहाणा केला. 'झोपडी कॅन्टींग किधर है', असे विचारत असतानाच, दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने फिर्यादीच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने ओढून तोडले.

### केडगावात राजकीय गाण्यावरुन वरातीत राडा

**अहिल्यानगर :** केडगाव उपनगरात राजकीय गाणे लावण्याच्या कारणावरून दोन गटात वाद होऊन एका तरुणाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना २६ एप्रिल रोजी रात्री ८.१० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गौरव धोंडीभाऊ कार्ले (वय २६, रा.कार्ले मळा, नेप्ती रोड, केडगाव) या तरुणाने फिर्याद दिली आहे. नेप्ती रोडवरील एकनाथ नगर भागात फिर्यादी गौरव कार्ले याचे मित्र निखिल देशमुख यांच्या लग्नाची मिरवणूक सुरू होती. ही मिरवणूक रात्री आठ वाजेच्या सुमारास सातपुते मळा परिसरात आली असता, आरोपी सागर सातपुते, भूषण गुंड, गणेश सातपुते आणि निलेश सातपुते यांनी मिरवणूक अडवली. आमच्या घरासमोर राजकीय व्यक्तीचे गाणे का लावले? असा जाब विचारत आरोपींनी वादाला सुरुवात केली. वादाचे रूपांतर पुढे हाणामारीत झाले. यावेळी आरोपींनी फिर्यादीला लाकडी दांडक्याने मारहाण करत अश्लील भाषेत शिवीगाळ केली, तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी तातडीने धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी कार्ले याच्या फिर्यादी वरून चौघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेंदवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

---

### जामखेड पंचायत समितीची आढावा बैठकीवर

## नागरिकांच्या प्रश्नांवर तात्काळ कार्यवाही : आ.पवार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** आ. रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज जामखेड पंचायत समितीत आढावा बैठक पार पडली. यावेळी त्यांनी कृषी, महावितरण, महसूल आणि पंचायत समितीशी संबंधित विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीत त्यांनी संबंधित विभागांशी निगडित नागरिकांच्या समस्या थेट ऐकून घेतल्या आणि त्या जागीच सोडविण्यासाठी प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या.

दरम्यान, अनेक कामांमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. काही ठिकाणी कामातील त्रुटी आणि निष्काळजीपणावरून संबंधित अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावत कामकाजात सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळालाच पाहिजे आणि प्रलंबित कामे लवकर पूर्ण झाली पाहिजेत, अशी ठाम भूमिका आ. रोहित पवार यांनी आढावा बैठकीत मांडली.तसेच येत्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाच्या तयारीचाही सखोल आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे आणि इतर आवश्यक सुविधा वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनबद्ध आणि प्रभावी कामकाज करण्याचे आदेश त्यांनी दिले. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने तत्परतेने प्रतिसाद द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस बीडीओ, संबंधित विभागांचे अधिकारी, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. एकूणच, या बैठकीतून नागरिकांच्या समस्या तातडीने मार्गी लावण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून प्रशासनालाही अधिक गतिमान आणि जबाबदार बनण्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला.

---

### सरकारचे जाचक धोरण-न्यायिक मागण्यांसाठी

## कर्जत कृषी केंद्र चालकांचा बेमुदत बंदचा इशारा



**कर्जत :** कृषी विक्रेत्यांच्या रास्त आणि न्यायिक मागण्यांवर कृषी विभागाकडून कोणताही ठोस निर्णय होत नसल्याने अहिल्यानगर जिल्ह्यासह कर्जत तालुक्यातील सर्वच कृषी केंद्र चालकांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थतेची व नाराजीची भावना निर्माण होत तात्काळ मार्ग न निघाल्यास नाईलाजास्तव बेमुदत कृषी केंद्र बंद ठेवण्याचा निर्णय कर्जत तालुका सीड्स फर्टिलायजर अँड पेस्टीसाईड्स असोसिएशनने दिला आहे. या आशयाचे निवेदन सोमवारी कर्जत तहसीलदार रवी सतवन यांना देण्यात आले.

राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या व्यवसायातील प्रलंबित अडचणीसंबंधी तसेच न्यायिक मागण्या संदर्भात राज्य कृषी विभाग कोणताही ठोस निर्णय घेत नाही. याबाबत वारंवार सर्व केंद्र चालकांनी आणि संबंधित संघटनांनी पाठपुरावा केला. मात्र आजमितीस त्यास यश आले नाही. यात कंपन्याकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना लिंकिंग बंद करणे, शेजारील राज्यातून येणारे अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाणे प्रतिबंधित करणे, साथी पोर्टलची वापराची विक्रेत्यांना सक्ती करणे यासह रासायनिक खतांचा पुरवठा फॉर पद्धतीने करावा, खतांच्या मिळकतीमध्ये वाढ करावी, पॅकबंद बियाणे विक्री केल्यास ते बियाणे फेल गेल्यास विक्रेत्यांस आरोपी न करता त्यांना साक्षीदार म्हणून मान्यता मिळावी, राज्याच्या कृषी विभागाकडून गुणवत्ता तपासणीसाठी भरलेल्या नमुना रकमा शासनाकडून विक्रेत्यास मिळावे, तसेच विक्री केंद्राची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या १५ वरून कमी करण्यात आली त्याची अधिसूचना कायम करण्यात यावी. यावेळी कर्जतचे तहसीलदार रवी सतवन यांना निवेदन देताना कर्जतचे अध्यक्ष विक्रम गदादे, सचिव प्रफुल्ल बरबडे, जिल्हा उपाध्यक्ष पोपट सुद्रीक, संकेत पाटील, नितीन भोईटे, सुभाष गांगर्डे, खजिनदार विशाल फडतरे, उपमन्यू शिंदे, दत्तात्रय भोसले, पंडित होले, हनुमंत उकले, भाऊसाहेब धोदाड, अजिंक्य मेहेत्रे, अविनाश गोरे, अशोक झगडे, अक्षय ढेरे, अजय खराडे, अमोल मेहेत्रे, सागर सरडे, अमर धांडे, राजू खरात, पृथ्वीराज शेंडगे आदी उपस्थित होते.

---

## प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांतर्गत नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आरएसपी (राष्ट्र विद्यार्थी पोलिस) विद्यार्थ्यांसाठी विशेष अग्निशमन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आग विझविण्याचे प्रत्यक्ष धडे देत आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढते तापमान आणि बदलते वातावरण यामुळे विविध प्रकारच्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. सध्या ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचणाऱ्या तापमानामुळे इलेक्ट्रिक वाहनांना आग लागणे, माळरान व डोंगर पेट घेणे, घरगुती विजेच्या शॉर्टसर्किटमुळे किंवा गॅस गळतीमुळे लागणाऱ्या आगी अशा घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आग लागल्यास योग्य उपाययोजना करून ती कशी नियंत्रणात आणावी याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.

महानगरपालिका अग्निशामक दलाचे अधिकारी शंकर मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक बंबाच्या साहाय्याने विविध प्रकारच्या आगी आटोक्यात आणण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

तसेच विजेचे शॉर्टसर्किट झाल्यास घ्यावयाची खबरदारी, पावसाळ्यात पूरस्थितीत अडकलेल्या नागरिकांना कशी मदत करावी, उंच इमारतींमध्ये आग लागल्यास लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे तंत्र याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रात्यक्षिकामध्ये अग्निशामक दलाचे कर्मचारी शिवदास वांढेकर, सूरज पोकळे, भारत पाडगे, सिद्धार्थ खरात, मयूर लांडगे, अमोल ढमाले, आतेष भापकर, प्रभात साठे आणि नागनाथ नाईक यांनी सहभाग घेत आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना प्रत्यक्ष करून दाखवल्या.

---

### जामखेडमध्ये महामार्ग अतिक्रमणावर कारवाईचा इशारा

## आठ दिवसांत हटवण्याचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८डी वरील अतिक्रमणांविरोधात प्रशासनाने कडक भूमिका घेत संबंधितांना नोटिसा बजावल्या आहेत. उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, पाथर्डी यांच्या कार्यालयामार्फत ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

खर्डा चौक ते बीड कॉर्नर दरम्यान महामार्गालगत करण्यात आलेल्या अवैध बांधकामे व अतिक्रमणांवर ही कारवाई केंद्रित आहे. दि. २४ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या उपस्थितीत जामखेड पंचायत समितीत महामार्ग विभाग, भूमी अभिलेख, नगर परिषद व महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

यापूर्वी दि. १ व २ एप्रिल २०२६ रोजी संबंधित सर्व विभागांच्या संयुक्त मोजणीत समर्थ हॉस्पीटल ते बीड रोड कॉर्नर ते खर्डा चौक या भागात महामार्गाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतरच प्रशासनाने नोटिसा देण्याची कारवाई हाती घेतली आहे.नोटिसनुसार, संबंधित अतिक्रमणधारकांनी आठ दिवसांच्या आत स्वतःहून अतिक्रमण काढून टाकावे, अन्यथा प्रशासनाकडून संयुक्त मोहीम राबवून अतिक्रमण हटवले जाईल. तसेच, त्या कारवाईचा संपूर्ण खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. महामार्गाचे रुंदीकरण व इतर विकासकामे सुरळीत पार पाडण्यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सर्व अतिक्रमणांवर समान कारवाई हवी!

जामखेडमधील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्याचा प्रशासनाचा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र ही कारवाई सर्व ठिकाणी समान व निष्पक्ष पद्धतीने झाली पाहिजे. दि. १ व २ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या संयुक्त मोजणीत समर्थ हॉस्पिटल ते बीड रोड कॉर्नर या भागात महामार्गाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

म्हणूनच प्रशासनाने निवडक कारवाई न करता या भागातील अतिक्रमणांवरही तातडीने कठोर कारवाई करावी. अन्यथा नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**– अवधूत पवार (सामाजिक कार्यकर्ते)**

---




## कर्जतच्या आठवडे बाजारामुळे वाहतूक कोंडी

### बाजारकरूंच्या गर्दीत अडकली रुग्णवाहिका!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जत बसस्थानकचे सिमेंट काँक्रीटीकरणामुळे एक प्रवेशद्वार बंद त्यामुळे एसटी आवक-जावक करताना पडणारी मर्यादा, त्यात सोमवार कर्जतचा आठवडे बाजार आणि मुख्य रस्त्यावर बाजारकरूंचे लागलेले अस्ताव्यस्त वाहने यामुळे दुपारी सव्वा दोनच्या सुमारास तब्बल अर्धा तास चांगलीच वाहतूक कोंडी जाणवली. या वाहतूक कोंडीत तब्बल दहा ते पंधरा मिनिटे एक रुग्णवाहिका अडकून पडली. चालकाने सतत सायरन वाजवत राहिल्याने इतर वाहन चालकांनी वेळेचे भान राखत त्या रुग्णवाहिकेस रस्ता दिला.

कर्जत शहरातील वाहतूक कोंडी पुन्हा एकदा चांगलेच डोकेदुखी ठरत आहे. मागील काही महिन्यापासून दादा पाटील महाविद्यालय ते भांडेवाडी दीड किलोमीटर अंतर पार करण्यासाठी वाहन चालकांना मोठी कसरत पार पाडावी लागते. यात सोमवारी आठवडे बाजार असल्यास बाजारकरू यासह विक्रेते यांची वाहने रस्त्यावर असल्यास त्यात अधिक भर पडते. सध्या कर्जत बसस्थानकात सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून बसस्थानकाचे एक प्रवेशद्वार या कामामुळे तात्पुरते बंद ठेवण्यात आले. याचा अतिरिक्त भार दुसऱ्या बाजूच्या प्रवेशद्वारावर पडत आहे. एसटीची लांबी जास्त असल्याने आत येताना आणि बाहेर पडताना मोठा टर्न घ्यावा लागत असल्याने काही काळ वाहतूक थांबली जाते. त्यात सोमवार, दि २७ रोजी दुपारी सव्वा दोन वाजता कर्जतचा आठवडे बाजार यासह शाळेला सुट्ट्या लागल्याने बाहेरगावी जाण्यासाठी कुटुंबाची लगबग आणि कर्जत शहर आणि परिसरातील नागरिक आठवडे बाजारासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडल्याने मोठी वाहतूक कोंडी घडली. दोन्ही बाजूस वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागल्या होत्या. त्यात अस्ताव्यस्त लावलेल्या दुचाकी-चारचाकी मोठ्या अडथळा ठरत होत्या. यातच एक रुग्णवाहीका या वाहतूक कोंडीत तब्बल दहा ते पंधरा मिनिटे अडकून पडली होती. इमर्जन्सी असल्याने रुग्णवाहिका चालकाने सतत सायरन वाजवत ठेवल्याने कोंडीत देखील इतर वाहन चालकांनी शक्य होईल तसा रस्ता मोकळा करीत रुग्णवाहिकेस मार्ग दाखविला. वाहतूक कोंडीवर पोलीस प्रशासन काम करीत असले तरी त्यांना पण कायमस्वरूपी कर्मचारी उपलब्ध करणे शक्य नसल्याने वाहतूक नियंत्रण करणे अवघड जात आहे.

### असताव्यस्त वाहनांना शिस्त लावणे हाच एकमेव पर्याय

कर्जत शहरात सतत वाहतूक कोंडी जाणवत असून अस्ताव्यस्त वाहने लावणे यास मोठी कारणीभूत ठरत आहे. यावर सर्व वाहन चालकांनी आपली वाहने रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण करणार नाही या पद्धतीने लावल्यास यावर तोडगा निघू शकतो. यासाठी स्वताला शिस्त लावणे हाच एकमेव पर्याय सध्या कर्जतकरांनी अवलंब करणे आवश्यक आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



# गोदावरीतून वाळूची चोरी;

## ट्रॅक्टर जप्त, दोघे फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांनी कारवाई करत वाहन जप्त केले असून दोन आरोपी फरार झाले आहेत. तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कमलपूर शिवारातील महानुभव मंदिराजवळ शुक्रवारी (दि. २३) सायंकाळी कारवाई करण्यात आली. पोलिसांना पाहताच चालक नितीन अशोक मुंजाळ (रा. कमलपूर) व त्याचा साथीदार शुभम चौधरी (रा. बाजारठाण, ता. वैजापूर) हे ट्रॅक्टर सोडून पळून गेले. जप्त ट्रॅक्टर-ट्रॉली व सुमारे १.५ ब्रास वाळू असा एकूण ५ लाख ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुटीच्या गोदावरी खोऱ्यात पाण्याच्या समृध्दीसाठी प्रयत्न : ना. विखे

## संजीवनी कार्यस्थळावर जलयात्रेचे स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव** : दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी महायुती शासनाचे कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणुन नामदार देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत प्रभावीपणे काम करून जल समृध्दी योजनेतुन प्रत्यक्ष कामावर भर दिला. तुटीच्या गोदावरी खो-यात पाण्याची समृध्दी व्हावी यासाठी नदी जोड प्रकल्पातुन ७८ टीएमसी पाणी आणण्याबाबतच्या कामाला सुरूवात होवुन त्यांचे जाणिवपुर्वक प्रयत्न असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे यांनी केले.



जिल्हयाच्या क्रांतिकारी कन्या अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या जलव्यवस्थापन कार्याचा ठसा संपुर्ण देशभर उमटविला त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमीत्त गोदा ते नर्मदा या जलयात्रेचा जन्मभुमी चौंडी (अहिल्यानगर) व त्रंबकेश्वर (नाशिक) येथुन शुभारंभ करण्यांत आला असुन ११७ नद्यांचे पाणी एकत्र करून त्याचा जलकलश सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रावर सोमवारी आला असता त्याचे पुजन करतांना ते बोलत होते.

उपस्थित मान्यवरांचा संजीवनी उद्योग समुहाच्यावतींने सत्कार करण्यांत आला. प्रारंभी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी प्रास्तविकात या जलयात्रेची संकल्पना स्पष्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व सर्व मंत्रीमंडळ दुष्काळमुक्त महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी जलसमृध्दीच्या ज्या योजना प्रभावीपणे राबवित आहे त्याचा आपल्यासह सर्व शेतक-यांना अभिमान असल्याचे सांगितले. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनीही पाणी अडवा पाणी जिरवा उपक्रमातुन कोपरगांव पंचक्रोशीतील भुगर्भातील पाण्याची समृध्दी टिकवुन ठेवण्यासाठी शेकडो बंधारे बांधुन जलसमृध्दीचे कार्य केलेले आहे. अहिल्यानगर नामकरणाचा अभिमान देशभरातील अहिल्याभक्तांना आहे.या वर्षी पहिल्यांदाच अशी जलयात्रा निघाली आहे जी चौंडी येथून महेश्वरपर्यंत जात आहे.

गोदा ते नर्मदा अशी ही यात्रा असून, याचे सर्व श्रेय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते.इतक्या मोठ्या प्रमाणात प्रत्येक गावागावात हजारो लोक जलयात्रेचे स्वागत करण्यासाठी उभे आहेत. असे प्रतिपादन आमदार पडळकर यांनी केले. यावेळी खासदार राम वडकुते, माजीमंत्री व शेतक-यांचे नेते सदाभाऊ खोत, गोदावरी मराठवाडा जलसंपदा विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगरचे कार्यकारी संचालक संतोष तिरमवार, कोल्हे कारखान्याचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे, सर्व संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी, नगरसेवक,शेतकरी, कार्यकर्ते आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी नगराध्यक्ष पराग संधान यांनी आभार मानले.

# लेकीच्या लग्नाआधीच वडिलांचा दुर्दैवी अंत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जालना** : आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण-लेकीच्या लग्नाची तयारी-आणि त्याच वेळी आलेला दुर्दैवी आघात भोकरदन तालुक्यातील नळणी बुद्रुक गावाजवळ रविवारी सायंकाळी झालेल्या भीषण दुचाकी अपघाताने दोन कुटुंबांचे आयुष्यच उद्ध्वस्त केले. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. मृतांमध्ये सुभाष कचरू साठे (३८) यांचा समावेश असून त्यांच्या मुलीचा विवाह अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला होता. घरात लग्नाची लगबग सुरू होती, नातेवाईकांची ये-जा, आनंदाचे वातावरण मात्र एका क्षणात सर्व काही संपले. लेकीला हळद लागण्याआधीच वडिलांचा मृत्यू झाल्याने साठे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आनंदाचे घर शोकसागरात बुडाले असून गावभर हळहळ व्यक्त होत आहे. या अपघातातील दुसरे मृतक अनिल संतोष बोराडे (२३, रा. बरंजळा साबळे) हे आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होते. हलाखीच्या परिस्थितीत मजुरी करून ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. जालना येथे न्यायालयीन काम आटोपून ते मित्रासह परतत असताना नियतीने त्यांच्यावर घाला घातला. त्यांच्या मृत्यूमुळे वृद्ध आई-वडिलांचा एकमेव आधार हिरावला गेला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष साठे व विकास साठे हे आपल्या दुचाकीवरून गावी परतत असताना समोरून येणाऱ्या अनिल बोराडे यांच्या दुचाकीची जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की तिघेही रस्त्यावर कोसळले. स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदत करत जखमींना रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तिघांना मृत घोषित केले. या अपघातात एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर जालना येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या घटनेने नळणी बुद्रुक आणि बरंजळा साबळे या गावांवर शोककळा पसरली असून, एका घरातील लग्नाचा आनंद आणि दुसऱ्या घरातील एकुलत्या मुलाचा आधार-दोन्ही क्षणात हिरावले गेल्याने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे.

# भोकरला बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर शिवारातील खंडागळे वस्ती येथे दत्तात्रय खंडागळे यांच्या घरासमोर रात्री आठ वाजेच्या सुमारास बिबट्याने शेळ्यांवर हल्ला करत एक शेळी ठार केल्याची घटना घडली. शुक्रवारी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास अचानक बिबट्याने शेळ्यांवर हल्ला चढवत एक शेळी घेवून पोबारा करत असतानाच भाऊसाहेब खंडागळे, संतोष खंडागळे, राजीव राजुळे, पोपट खंडागळे, सागर खंडागळे, नारायण खंडागळे, कृष्णा खंडागळे यांनी बिबट्याचा पाठलाग केला. यावेळी बिबट्याने शेळी सोडून पळ काढला. बिबट्याच्या धास्तीने परिसरातील नागरिकांना रात्र जागवून काढावी लागली. घटनेची माहिती मिळताच वनाधिकारी मेहबुब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अक्षय बडे यांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. या परिसरात वनविभागाने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अन्यथा तीव्र अंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिगंबर खंडागळे, दत्तात्रय खंडागळे, ठकसेन खंडागळे, रखमाजी खंडागळे, सुरेश खंडागळे, विजय खंडागळे, सुनिल वाकडे यांनी दिला आहे.

# हॉटेल मालकास लोखंडी रॉडने मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : हॉटेलमध्ये सुरू असलेला गोंधळ थांबवण्याचा प्रयत्न केल्याच्या रागातून हॉटेल मालकावर लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी शहरातील बाजार समितीसमोरील परिसरात घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवींद्र गोरख पाटोळे (वय ३५, रा. राहुरी खुर्द) यांचे 'जयमल्हार टी सेंटर' नावाचे चहा व वडापावचे दुकान आहे. २५ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता आरोपी बाप्पुसाहेब गोपाळे हे मद्यधुंद अवस्थेत दुकानात येऊन ग्राहकास शिवीगाळ करत मारहाण करू लागले. यावेळी पाटोळे यांनी मज्जाव केल्याने आरोपीने त्याचे मुलगे अक्षय व अभि गोपाळे यांना बोलावून घेतले. त्यानंतर तिघांनी मिळून पाटोळे यांचा पुतण्या समर्थ पाटोळे याला मारहाण केली. त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या रवींद्र पाटोळे यांनाही लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. तसेच दुकानातील पाण्याचे भांडे उलटवून नुकसान केले. या गोंधळात पाटोळे यांच्या गळ्यातील सुमारे दीड ग्रॅम वजनाचे सोन्याचे ओम आकाराचे पान गहाळ झाले. आरोपींनी जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी रवींद्र पाटोळे यांच्या फिर्यादीवरून अक्षय, अभि व बाप्पुसाहेब गोपाळे (रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# श्रध्दा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या भूमीत जल यात्रा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : संपूर्ण जगाला श्रध्दा आणि सबुरीचा संदेश देणार्या साईबाबांच्या भूमीत पुण्यश्लोक अहील्यादेवीचा जयजयकार करीत श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून निघालेल्या दोन्ही यात्रा शिर्डीत दाखल झाल्या. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा केलेला संकल्प जलयात्रेच्या निमिताने पूर्ण करण्याचा निर्धार जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.



अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून गोदा ते नमर्दा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे गोदा नदीचे उगमस्थान असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे जन्मस्थळ असलेल्या चोंडी येथून यात्रेची सुरूवात करण्यात आली.दोन्ही यात्रा शिर्डी मध्ये एकत्रित होवून मध्यप्रदेशकडे सोमवारी रवाना होणार आहेत. राज्यातील सर्व नद्यामधून आलेल्या जलकलशाचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिर्डीमध्ये जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील खा.वडतुके आ.गोपीचंद पडळकर आ.सदाभाऊ खोत यांच्यासह शिर्डीकर ग्रामस्थांनी शहरातील मल्हारी मार्तंड मंदीरात पूजन करून यात्रेचे स्वागत केले.

शहरातील प्रमुख मार्गावरून जलकलशाची शोभायात्रा काढून जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचा संदेश चित्रफितीतून देण्यात आला. पूण्यश्लोक अहील्यादेवींचा पुतळा आणि कलशाचा रथ जलयात्रेचे मुख्य आकर्षण आहे. धनगर नृत्य तसेच मंत्री विखे पाटील यांच्यासह सर्व सहभागी आमदारांचा बस मधून चाललेला प्रवास चर्चेचा विषय ठरला आहे.

यात्रेच्या निमिताने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक सोहळ्यात बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जलसंवर्धनाची चळवळ महत्वपूर्ण होतीच पण सांस्कृतिक परंपरेचा वारसा सुध्दा त्यांच्याकडून आपल्याला मिळाला.श्री दासगणू महराजांनी श्री साईबाबा सुवर्ण मंजिरी ग्रंथ महेश्वर येथे लिहीला त्यामुळे शिर्डी आणि महेश्वर नगरीच नात हे अध्यात्माने जोडले गेले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# उन्हाळ्याच्या झळांत वन्यजीवांना दिलासा

## वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये टॅंकरने सोडले पाणी; प्रभाकरम फाउंडेशनचा उपक्रम



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : उन्हाळ्याच्या तीव्र झळा वाढत असताना जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आटत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभाकरम फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत चास येथील वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये टॅंकरद्वारे पाणी सोडण्याचा उपक्रम राबविला. दरवर्षीप्रमाणे यंदाही फाउंडेशनकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात आला. फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी संबंधित पाणवठ्याची पाहणी करून टॅंकरच्या माध्यमातून पाणी सोडले.

यामुळे बिबटे, हरिण, ससा, कोल्हा, माकड तसेच विविध पशु-पक्ष्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाण्याअभावी वन्यप्राण्यांना मानवी वसाहतीकडे वळण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, सौरभ गावखरे आदी उपस्थित होते.

# टपरी हटविण्याविरोधात पालिकेकडे धाव

## मूळ जागा व नुकसानभरपाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नगर परिषदेच्या अतिक्रमण कारवाईत अन्याय झाल्याचा आरोप करत भगतसिंग चौकातील टपरीधारक विकास सुनिता सोन्याबापू जाधव यांनी मूळ जागा परत मिळावी तसेच नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी पालिकेकडे केली आहे. जाधव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर नगर परिषदेने कोणतीही पूर्वसूचना न देता राजकीय दबावाखाली त्यांचे 'महेश मेन्स पार्लर' हे दुकान पाडले. हे दुकान भगतसिंग चौक पाटाच्या कडेला असून ३० मीटरच्या मर्यादेबाहेर असतानाही कारवाई करण्यात आली, असा त्यांचा दावा आहे. विशेष म्हणजे, शहरातील गांधी चौक, मेनरोड, गिरमे चौक, सिद्धिविनायक गणपती मंदिर परिसर तसेच शिवाजी महाराज रोडवरील अनेक टपऱ्या व गाळे ३० मीटरच्या आत असूनही त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही कारवाई पक्षपाती व अन्यायकारक असल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे. जाधव यांनी पुढे नमूद केले की, सदर टपरी १९९८ सालच्या स्थायी समितीच्या 'टपरी नामांतरण' ठरावानुसार त्यांच्या आई सौ. सुनिता सोन्याबापू जाधव यांच्या नावावर अधिकृतपणे मंजूर आहे. तरीदेखील नियमात बसणारे दुकान पाडून त्या जागेवर अनधिकृतपणे पोलिस मदत केंद्र उभारण्यात आले असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. गेल्या १५ महिन्यांपासून व्यवसाय बंद असल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले असून कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर परिणाम झाला आहे. त्यामुळे स्थायी समितीचा १९९८ चा ठराव ग्राह्य धरून टपरीची मूळ जागा त्वरित परत द्यावी, तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई व पुनर्वसनासाठी आर्थिक सहाय्य मंजूर करावे, अशी मागणी जाधव यांनी केली आहे. या प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चित्रकार भागवत व पत्रकार देसाई गाडगेबाबा पुरस्काराने सन्मानित



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : डेबुजी प्रतिष्ठान व कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय, इंगळी, कोल्हापूर यांच्यावतीने दिला जाणारा राष्ट्रीय डेबुजी संत गाडगेबाबा सन्मान पुरस्कार यंदा येथील प्रसिद्ध चित्रकार पत्रकार रवी भागवत व पत्रकार राजेंद्र देसाई यांना प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शिर्डी येथे २८ वे राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन नुकतेच आयोजित करण्यात आले होते. यावेळी पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र फंड होते तर स्वागताध्यक्ष व कवी संमेलनाध्यक्ष डॉ. शंकर अंदाणी हे होते. संमेलनाचे उद्धटन साहित्यीक श्रीकांत पाटील यांच्या हस्ते झाले.

प्रमुख पाहुणे म्हणून मीरा भाईंदर उबाठा गटाच्या उपसंघटक सुमन देसाई, किसन कुऱ्हाडे, मया नवथर, साहित्यीक डॉ. शिवाजी शिंदे, बाळासाहेब देशमुख, सुधाकर वाघ, सुनील निकम, सुधाकर देसाई, अनिल देसाई, राजश्री फंड आदी उपस्थित होते

# झाडे लावायची तरी कशाला? : माजी आमदार डॉ. सुधीर तांबे





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणावर जंगलांना लागणाऱ्या आगीमुळे पर्यावरणाला गंभीर फटका बसत असून या घटनांबाबत प्रशासनाकडून समाधानकारक उपाययोजना होत नसल्याचा आरोप माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केला.

> या संदर्भात वनमंत्र्यांना निवेदन देणार असल्याचे सांगत, राज्यभरातील जंगलांमध्ये लागणाऱ्या आगी रोखण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणीही डॉ. तांबे यांनी केली.

मालदाड येथे लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. वारंवार लागणाऱ्या आगींमुळे झाडे आणि वन्यजीवांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि नैराश्य वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आपण दंडकारण्य अभियानाच्या माध्यमातून वृक्षलागवड आणि पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत आहोत. मात्र, अशा प्रकारे आगी लागत राहिल्या तर झाडे लावायची तरी कशाला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हे चित्र केवळ संगमनेरपुरते मर्यादित नसून राज्यभरात अनेक ठिकाणी अशा घटना घडत असल्याचे त्यांनी सांगितले. पेठ आणि कळवण तालुक्यातही मोठ्या प्रमाणावर जंगलांना आग लागल्याची उदाहरणे त्यांनी दिली.

मालदाड येथे अलीकडेच डोंगरावर लागलेल्या आगीमुळे स्थानिक सरपंच आणि नागरिक हतबल झाल्याचे त्यांनी नमूद केले. जंगलांना आग लागू नये यासाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचे सांगत त्यांनी वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. झाडे लावण्याबरोबरच ती जगली पाहिजेत, यासाठी जनजागृती आणि ठोस कृती आवश्यक आहे.

आगी का लागतात याचे नेमके कारण शोधून त्यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.